# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## मुंबईतील विकास प्रकल्पांमुळे मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याऱ्या समितीवर प्रतिनिधीत्व देण्याबाबत

**(१) ३३८५२ (०७-०१-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर परिसरातील किनारपट्टीच्या भागात विविध विकास कामे करण्यात येत असल्यामुळे मच्छिमारांच्या उपजिवीकेचे नुकसान होत असल्याची तक्रार सातत्याने होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार प्रकल्पांमुळे नुकसान होणाऱ्या मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय दिनांक ११ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीमध्ये मच्छिमारांचे प्रतिनिधी घेण्यात आलेले नसल्यामुळे मच्छिमारांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर समितीवर मच्छिमारांना प्रतिनिधीत्व देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०८-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.२०१६/२०२१ मध्ये दिनांक १२.०८.२०२१ रोजी आदेशानुसार, राज्याच्या किनारपट्टी भागात विविध प्रकल्पांमुळे बाधीत होणाऱ्या मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्यासाठी राज्यव्यापी धोरण तयार करण्याकरिता प्रधान सचिव (पदुम), मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती शासन निर्णय, दिनांक ११.१०.२०२१ अन्वये गठीत करण्यात आली आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

मच्छिमार सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींचे अभिप्राय जाणून घेण्याच्या उद्देशाने, समिती अध्यक्षांमार्फत दिनांक २६.१०.२०२१ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. तसेच मच्छिमारांचे मुद्दे, विचार मांडण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिर आवाहन करण्यात आले होते. सदर आवाहनाच्या अनुषंगाने प्राप्त मुद्दे विचारात घेऊन, शासन निर्णय, दिनांक ९.०३.२०२३ रोजी जाहीर केलेल्या राज्यस्तरीय मच्छिमार नुकसान भरपाई धोरणात समाविष्ट करण्यात आलेले आहे. त्यानुसार मच्छिमारांना रू.२५ हजारापासून ते रू.६ लाखांपर्यंत नुकसान भरपाई देण्याची तरतूद आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शेतकरी व सामान्य नागरीकांच्या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर कालबाह्य नोंदी कमी करण्याबाबत

**(२) ३६०९४ (०७-०१-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकरी व सामान्य नागरीकांच्या जमिनीच्या मालकी हक्काचा पुरावा असलेला सातबारा उता-यावर मागील अनेक वर्षापासून इतर हक्कामध्ये तगाई, बंडीग, सावकारी बोजे आणि नजर गहाण यासह अस्तित्वात नसलेल्या संस्थाच्या नावाच्या विविध बोजांची कालबाह्य नोंदी माहे ऑगस्ट मध्ये वा त्यादरम्यान कमी करण्याचे आदेश शासनाने दिले असताना सोलापूर जिल्ह्यात व पुणे विभागात अंमलबजावणी न झाल्याने शेतकऱ्यांना कर्ज मिळण्यासाठी त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारचे कालबाह्य नोंदी कमी करण्याबाबत विभागीय आयुक्त, पुणे तसेच जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी आदेश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दिलेल्या आदेशाची अमंलबजावणी न करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-१२-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देवगड (जि. सिंधुदुर्ग) तालुक्यातील आनंदवाडी येथे अत्याधुनिक व सुसज्ज मत्स्यव्यवसाय बंदर उभारण्याबाबत

**(३) ३८४६७ (०७-०४-२०२२). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड (जि. सिंधुदर्ग) तालुक्यातील आनंदवाडी येथे अत्याधुनिक व सुसज्ज मत्स्यव्यवसाय बंदर उभारण्याचे शासनाने निश्चित करुन सदरहू प्रकल्पाच्या सातव्या पंचवार्षिक योजनेत समावेश करण्यात आलेल्या दहाव्या पंचवार्षिक योजनेअखेरपर्यंत म्हणजेच ३१ मार्च, २००७ पर्यंत पूर्ण करण्याचे निश्चित केल्यानंतरही, हा प्रकल्प उभारण्याच्या संदर्भांत शासनाकडून सन २००५-०६ अखेरपर्यंत कोणतीच कार्यवाही न झाल्यामुळे, सन २००६-०७ व सन २००७-०८ तसेच अर्थसंकल्पातील मत्स्य विभागाच्या चर्चेच्यावेळी अनेक सन्माननीय सदस्यांनी कपात सूचनेच्या माध्यमातून तसेच अन्य संसदीय आयुधाद्वारे हा विषय सातत्याने सभागृहात उपस्थित केल्यानंतर तत्कालीन सरकारने सन २००५-०६, २००६-०७ व २००७-०८ या तीन आर्थिक वर्षांत मिळून एकूण १५ कोटी ६९ लक्ष ९ हजार इतकी भरघोस आर्थिक तरतूद केलेली होती. तथापि, या प्रकल्पाचे काम सुरु करण्यास विलंब लागल्यामुळे अनेक सन्माननीय सदस्यांनी पुन्हा सभागृहात चर्चा केल्यानंतर सदर कामाची निविदा पूर्ण होऊन, अभियंता, सिंधुदुर्ग यांनी दिनांक १२ ऑक्टोबर, २००७ रोजी वा त्यासुमारास कंत्राटदार मे.आर. बी. चव्हाण, गोरेगाव, मुंबई यांना सुसज्य बंदर उभारण्याचे आदेश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशानुसार दिनांक २६ डिसेंबर, २००७ रोजी वा त्यासुमारास ठेकेदाराकडून या प्रकल्पाच्या तीन टप्प्यापैकी पहिल्या टप्प्याच्या कामास सुरुवात होऊन, मे, २००८ अखेरपासून पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण होऊन स्थानिकांनी प्रस्तावित आराखड्यास विरोध दर्शविल्यामुळे काम बंद पडले या पहिल्या टप्प्याच्या भरावाच्या कामासाठी ५ कोटी १७ लाख ३३ हजार इतका निधी शासनाकडून खर्च करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर काळात स्थानिक ग्रामस्थाबरोबर पुन्हा चर्चा होऊन, सदरचे काम पुन्हा सुरु करण्यासाठी सी.आय.सी.ई.एफ यांनी तयार केलेल्या मांडणी नकाशाला स्थानिकांनी सहमती दर्शविल्यानंतर पुन्हा केंद्र सरकारकडे रु. ९२.५० कोटी अंदाजित खर्चाच्या सुधारित प्रस्ताव दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास सरकारकडून सादर करण्यात आला व या सुधारित प्रस्तावास केंद्र सरकारने दिनांक २८ मार्च, २०१८ रोजी वा

त्यासुमारास मंजुरी दिल्यानंतर शासन निर्णयान्वये सदरहू आनंदवाडी येथील मत्स्य व्यवसाय बंदराच्या सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करुन दिनांक ४ जुलै, २०१८ रोजी विधानमंडळास सादर केलेल्या सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या खर्चाचे पूरक विवरण पत्रान्वये रु. २६ कोटी ८ लाख ७० हजार इतक्या रक्कमेची तरतूद केली व त्यानुसार पुन्हा सदरहू मत्स्यव्यवसाय बंदर प्रकल्पाचे काम जोमाने सुरु होऊन पुन्हा एकदा मागील ६ महिन्यांपासून सदरहू प्रकल्पाचे काम बंद पडलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू मत्स्य व्यवसाय बंदराच्या उभारणीचे काम आता पुन्हा मागील ६ महिन्यांपासून बंद पडण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(५) असल्यास, सदरहू बंद असलेले काम विनाविलंब हाती घेऊन पूर्ण करण्यासंदर्भांतील मागणी दिनांक १४ जानेवारी, २०२२ रोजी तहसिलदार, देवगड यांचेकडे मच्छिमार संस्थांनी व मच्छिमार वर्गातील बांधवांनी प्रत्यक्ष भेट घेऊन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदरहू मत्स्यव्यवसाय बंदर उभारणीचे बंद असलेले काम विना विलंब हाती घेऊन पूर्ण करुन सदर बंदर लवकरात लवकर कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०८-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४), (५) व (६) आनंदवाडी मत्स्यबंदर उभारणीचे काम महामंडळाकडे हस्तांतरीत झाल्यानंतर महामंडळाने कंत्राटदारास माहे मार्च, २०१९ रोजी कार्यारंभ आदेश पारित केलेले आहेत. मत्स्यबंदराचे काम सुरळीत सुरू असतांना माहे मार्च, २०२० पासून कोरोनाच्या प्रार्दुभावामुळे संपूर्ण देशात टाळेबंदी करण्यात आलेली होती. राज्य शासनाच्या दिनांक १३/०४/२०२१ रोजीच्या आदेशान्वये बांधकाम उद्योग व बंदर विकास या क्षेत्राशी संबंधित निगडीत पूरक व्यवसाय कोरोनाच्या टाळेबंदीमधून सूट दिलेली होती. त्या आधारे जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीने महामंडळाने मत्स्यबंदराचे बांधकाम सुरू ठेवले. सद्य:स्थितीत मत्स्यबंदर उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे.

---

## पुराभिलेख संचालनालयातील अभिलेखाधिकारी गट ब (अराजपत्रित) पदावरील नियमबाह्य पदोन्नती दिल्याबाबत

**(४) ४२२९७ (१२-०४-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुराभिलेख संचालनालयातील सेवा नियमातील ३ (अ) नुसार संशोधन सहायक, संकलक, मोडीज्ञान सहायक आणि अभिलेखपाल पदावरील ३ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या आधारावर पात्र ठरविलेल्या व्यक्तींचा पदोन्नतीने पदोन्नती देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना, नागरी सेवा नियमावली,२०२१ दिनांक २१ जून २०२१ नुसार शासकीय कर्मचाऱ्यांचा अखंडित सेवा कालावधीवरून ज्येष्ठता निश्चित करण्याचे धोरण आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संचालनालयातील संशोधक सहायक, संकलक, मोडीज्ञान सहायक, अभिलेखपाल (विभागीय कार्यालयातील) या गट - क पदांची ज्येष्ठता सूची ही सन २०२० पर्यंत सर्व विभागीय कार्यालयांची मिळून एकत्र प्रसिद्ध करण्यात येत होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सन २०२० मध्ये प्रसिद्ध केलेल्या ज्येष्ठता क्रमांक ५ व असलेल्या कर्मचाऱ्यास नियमबाह्य पदोन्नती देण्यात यावी, म्हणून सन २०२१ साली शासनाची कोणतीही मंजुरी न घेता नियमबाह्य प्रत्येक विभागाची विभागस्तरावर स्वतंत्र सेवाज्येष्ठता यादी तयार करून सन २०२० मध्ये ज्येष्ठता सूचीमधील क्रमांक ५ च्या कर्मचाऱ्यास सन २०२१ च्या सेवाज्येष्ट्ता सूचीमध्ये मुंबई कार्यालयात क्रमांक १ वर दाखवून अभिलेखाधिकारी पदावर नियमबाह्य पदोन्नती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ज्येष्ठता सूचीतील क्रमांक ४ पर्यंतचा कर्मचार्यांनी या प्रकरणी शासन स्तरावर निवेदने, तक्रारी दाखल करून आता सहा महिन्याचा कालावधी उलटूनही त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसून पदोन्नतीपासून वंचित ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-११-२०२२) :** (१) होय,
(२) होय,
(३) अशंत: खरे आहे,
सन १९८१ ते २०१३ पर्यंत कार्यालय निहाय स्वतंत्र सेवा ज्येष्ठता ठेवण्यात येत होत्या.
त्यानंतर सन २०१४ ते २०२० पर्यंत एकत्रीत सेवा ज्येष्ठता यादी ठेवण्यात येत होती. परंतू एकत्रित सेवा जेष्ठता यादीबाबत सेवा प्रवेश नियमात तरतूद नसून याबाबत शासनाची मान्यता घेण्यात आलेली नाही. त्यामुळे सन २०२१ पासून सेवा जेष्ठता यादी कार्यालय निहाय ठेवण्यात येत आहे. तसेच नमूद करण्यात आलेल्या पदांचे कामकाजाचे स्वरुप भिन्न असल्याने सेवा जेष्ठता यादी एकत्रित करण्यात येवू नये, असे विभागीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी संचालनालयास निवेदने दिलेली आहेत.
(४) हे खरे नाही.
सन २०२१ नंतर कार्यालय निहाय सेवा जेष्ठता यादी ठेवण्यात आल्यामुळे सेवा जेष्ठतेचे क्रमांक बदललेले आहेत. त्या अनुषंगाने सर्व विभागीय कार्यालयात सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नत्या देण्यात आल्या आहेत. नियमबाह्य पदोन्नती देण्याबाबतचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) सेवा ज्येष्ठता यादी प्रसिध्द करतांना आक्षेप असल्यास यादी प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत लेखी आक्षेप नोंदवावेत. या कालावधीत कोणतेही आक्षेप न आल्यास सेवा ज्येष्ठता यादी अंतीम समजन्यात येईल व त्यानंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही, असे कळविण्यात आले होते. मात्र सेवा ज्येष्ठता यादीबाबत या विहीत मुदतीत शासनाकडे तथा संचालनालयाकडे तक्रार तथा आक्षेप नोंदविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे तक्रारीवर कार्यवाही न करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील ग्रामरोजगार सेवकांच्या प्रलंबित प्रश्नांच्या मागणीबाबत

**(५) ४३६५३ (१२-०४-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामरोजगार सेवकांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत रोजगार हमी योजना मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्यासमवेत बैठकीची मागणी लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत एकूण होणाऱ्या कामाच्या ६% रक्कम संबंधीत रोजगार सेवकास वेतन किंवा मानधन स्वरुपात मिळते तसेच याप्रकरणी योजनेची कामे करण्याकरीता आवश्यक ती कामे गावनिहाय होताना दिसत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात जिल्हानिहाय करण्यात आलेल्या सन २०१४ या कालावधीत ते आज अखेर निधीचा तपशील काय आहे, तसेच राज्यातील प्रत्यक्ष जॉबकार्ड असणाऱ्या व्यक्तींची जिल्हानिहाय संस्था किती आहे,
(४) असल्यास,उक्त रोजगार सेवकांना उत्तर प्रदेश शासनाच्या धर्तीवर १०,००० मानधन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२७-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही मागणी प्रधान योजना आहे. ज्या ग्रामपंचायतीमधे मजुरांमार्फत कामाची मागणी आहे, अशा ग्रामपंचायतीमध्ये आवश्यक कामे घेण्यात येतात.
(३) मनरेगा योजनेवर सन २०१४-१५ ते सन २०२१-२२ या कालावधीत मजूरीवरील रू.१०७५४४५.६९/- इतका खर्च झाला आहे व राज्यातील जॉब कार्ड धारकांची Nrega Soft वरील अहवालानुसार जिल्हानिहाय संख्या ६८३७३६९५/- इतकी आहे.
(४) मनरेगा योजने अंतर्गत महाराष्ट्र राज्यामध्ये ग्रामरोजगार सेवकांना संबंधित ग्रामपंचायती मार्फत मनुष्य दिवसाच्या आधारावर मानधन देण्याचे धोरण आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**खेड, दापोली व मंडणगड (जि.रत्नागिरी) खाडीतील गाळ काढण्याबाबत**

**(६) ४५५३८ (२५-१०-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड, दापोली व मंडणगड (जि.रत्नागिरी) तालुक्यांमधील खाडीतील गाळ काढण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास मा.बंदरे व खारभूमी विकास राज्यमंत्री यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०८-२०२३) :** (१) होय.
(२) हर्णे, ता.दापोली येथील खाडीतील गाळ काढण्याचे काम केंद्र शासनाच्या मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील पायाभूत सुविधा विकास निधी योजना (FIDF) अंतर्गत प्रस्तावित असून सदरील काम महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी वर्ग करण्यात आलेले आहे. तसेच पर्यावरण पूरक परवानगीकरिता रू.४.१९ कोटी निधी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना वितरीत केलेले आहे. त्यानुषंगाने पर्यावरण पूरक परवानगी प्राप्त झाल्यानंतर कामास सुरूवात करण्यात येईल.
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचेमार्फत दापोली मधील आंजर्ला खाडीमध्ये गाळ उपसणीच्या कामचे कार्यादेश देण्यात आले आहे. तसेच खेड, दापोली व मंडणगड येथील गाळ उपसणीबाबत सुधारित अंदाजपत्रक निधी उपलब्धतेसाठी सादर करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील प्रकल्पामुळे बाधीत होणाऱ्या मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्यासाठी समिती नेमण्याबाबत**

**(७) ४८८३९ (०४-११-२०२२). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रकल्पामुळे बाधीत होणाऱ्या मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्यासाठी आणि त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशावरुन समिती स्थापन करण्यात आली असल्याचे दिनांक १५ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीत मच्छिमारांच्या प्रतिनिधींचा समावेश करावा अशा प्रकारचे नियोजन मत्स्यव्यवसाय आयुक्तांना ई-मेलव्दारे पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०८-२०२३) :**(१) हे खरे नाही.

मा.उच्च न्यायालयाने दिनांक १२/०८/२०२१ रोजी दिलेल्या आदेशानुसार प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात राज्यव्यापी धोरण तयार करण्याचे प्रस्तावित केले होते. त्यानुसार राज्याच्या किनारी भागात विविध यंत्रणामार्फत हाती घेण्यात येणाऱ्या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्यासाठी मा.आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती.
(२) होय हे खरे आहे.

मा.प्रधान सचिव (पदुम) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीमध्ये मच्छिमारांचा समावेश होणेबाबत निवेदन पत्र ई-मेल प्राप्त झालेले आहेत.

या पार्श्वभूमीवर मच्छिमार सहकारी संस्थांच्या प्रतिनिधीचे अभिप्राय जाणून घेण्याच्या उद्देशाने मा.प्रधान सचिव (कृषि व पदुम) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६/१०/२०२१ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.
(३) सदर विषयासंबंधित उचित माहिती प्राप्त करण्याच्या अनुषंगाने विविध विषयतज्ञ, शास्त्रज्ञ, संस्था व मच्छिमार सहकारी संस्था यांचेकडून अभिप्राय मागविण्याकरिता वर्तमानपत्रात एक जाहिर आवाहन करण्यात आले होते.

उपरोक्त प्राप्त झालेले अभिप्राय/ मुद्यावर समिती सदस्यांसमवेत विचार विनिमय करून राज्यातील बांधकाम प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छिमारांना नुकसान भरपाई अदा करण्यासाठी दिनांक ९ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयानुसार धोरण निश्चित करण्यात आले आहे. या धोरणानुसार राज्यातील बांधकाम प्रकल्पामुळे नुकसान झाल्यास रू.१००० कोटी पर्यंत प्रकल्पाची गुंतवणूक असल्यास प्रकल्प किंमतीच्या २ टक्के इतकी नुकसान भरपाई देण्याची तरतूद आहे. रू.१००० कोटी पेक्षा जास्त प्रकल्पाची गुंतवणूक असल्यास प्रकल्प किंमतीच्या २ टक्के किंवा ५० कोटी रूपये मर्यादेत नुकसान भरपाई देण्याची तरतूद आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोरिवली (मुंबई) येथील स.न.२०९ या शासकीय मिळकतीवर झालेल्या अतिक्रमणाबाबत**

**(८) ४९४५५ (१७-०१-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरिवली (मुंबई) येथील स.न.२०९ चा भूखंड हा महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १८ जानेवारी, २००७ अन्वये व महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण दिनांक ७ जुलै, २००८ अन्वये संरक्षित वने म्हणून घोषित झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू शासकीय भूखंडावर मध्य सरकार असे नाव असून तेथील तिवरांच्या झाडांची नोंद केलेली असून सदर जागेवरील कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे सन २००९ व २०२१ या कालावधीत निदर्शनास आल्यामुळे स्थानिक पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे नोंदविण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आजमितीस सदर शासकीय भूखंडावर चारही बाजूला पत्र्याचे कंपाऊंड, अनिवासी गोडाऊन, अंदाजे ४० कार्यालये व ३० ते ३५ निवासी बांधकामे, व्हिजन स्टुडीयो, यामाहा मोटरसायकलचे शोरुम तसेच अवैध बांधकामांची नोंद सन २००९, २०२१ व २०२२ रोजी बोरिवली तहसिलदार कार्यालयात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१९-०७-२०२३) :** (१) मौजे बोरीवली, ता.बोरीवली येथील स.नं.२०९ या मिळकतीचे एकुण क्षेत्र ३.९४.०६ हेक्टर आर एवढे आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसुचना दिनांक ०७/०७/२००८ अन्वये उक्त

नमूद मिळकतीमधील १.८१ हेक्टर आर क्षेत्र "संरक्षित वन" म्हणून घोषित झाले आहे. तसेच भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ४ अन्वये दिनांक ०४/१०/२०१३ अन्वये सदरचे क्षेत्र "राखीव वन" म्हणुन घोषित करण्यात आले आहे. या अधिसूचित क्षेत्राचा ताबा दिनांक ०३/१०/२०१३ रोजी मुंबई वन विभागाकडून कांदळवन कक्ष वन विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे.

(२), (३) व (४) होय हे खरे आहे.

सदर मिळकतीमध्ये अनधिकृत बांधकाम व कांदळवन ऱ्हासाबाबतच्या प्राप्त तक्रारीं व अनधिकृत बांधकामे इ. अनुषंगाने पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ अंतर्गत तरतूदीन्वये एम.एच.बी. पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.०६/०९, दिनांक २२/०१/२००९ अन्वये श्री. नितीन परशुराम चावरे यांचेवर व गु.र.क्र.४६/२०२१, दिनांक ०१/१०/२०२१ अन्वये एकूण १८ व्यक्ती संस्थावर गुन्हे दाखल करण्यात आले असून, गुन्हा क्र.ई/०२/२०२२, दिनांक २९/०१/२०२२ रोजी नोंद करण्यात आला होता. त्यानुषंगाने दिनांक २४/०६/२०२२ रोजी मिळकतीची मोजणी करुन मौजे बोरीवली येथील स.नं.२०९, न.भू.क्र.४ च्या मिळकतीची हद्द निश्चित आली आहे.

मौजे बोरीवली येथील स.नं.२०९ मधील जमीन भारत सरकारच्या (आंतरराष्ट्रीय अनुश्रवण केंद्र, दुरसंचार विभाग) नावे दाखल असल्याने या मिळकतीवरील सर्व अतिक्रमणे केंद्र शासनाच्या आंतरराष्ट्रीय अनुश्रवण केंद्र, दुरसंचार विभागाने अतिक्रमण धारकांना रितसर नोटीसा बजावून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या यंत्रणेमार्फत व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या मदतीने दिनांक ११/०२/२०२३ रोजी सदर जमिन अतिक्रमणापासून मोकळी करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे बोरिवली (मुंबई) येथील शासकीय भूखंडावर बे व्ह्यू हॉटेल व्यावसायीकाने केलेल्या अवैध बांधकामांबाबत

**(९) ४९४५६ (२९-०१-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बोरिवली (मुंबई) येथील स.न. २०१, न.भू.क्र. १७ या शासकीय भूखंडावर सर्वत्र घाण पसरली असून तेथील बे व्ह्यू हॉटेलने पत्र्याची शेड टाकून अवैध बांधकाम केल्याचे तसेच शासकीय प्रकल्प कांदळवन उद्यानाला जाणाऱ्या जोड रस्त्यावर देखिल अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शासकीय भूखंडावरील अतिक्रमणाचे निष्कासन करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१९-०७-२०२३) :** (१), (२) व (३) मौजे बोरीवली, ता. बोरीवली येथील स.नं.२०१, न.भू.क्र.१७ च्या हद्दी बाहेर पश्चिमेकडील बाजूस खाजण असून खाजण जमिनीच्या पश्चिमेकडील बाजूस खाडी पैकी जागेत बे व्ह्यू हॉटेलच्या व्यावसायिकाने हॉटेलचे पक्के बांधकाम केले आहे. तसेच या ठिकाणी प्रस्तावित कांदळवन उद्यान प्रकल्पास जाणाऱ्या जोड रस्त्यावर पत्र्याच्या शेडचे अतिक्रमण आहे.

सदर अतिक्रमण धारकांविरुध्द उप जिल्हाधिकारी (अति./निष्का.) बोरीवली-१ यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ५० अन्वये दिनांक २४/०१/२०२२ रोजी अतिक्रमण निष्कासनाची नोटीस बजावली होती. तथापि, संबंधित अतिक्रमणधारकांनी सदर कारवाई विरुध्द मा. दिवाणी न्यायालय, दिंडोशी येथे दावा क्र. २४७/२०२२ दाखल केला होता.

या प्रकरणी मा. दिवाणी न्यायालय, दिंडोशी यांनी याचिकाकर्ता / अतिक्रमणधारक यांचा दावा दिनांक २५/०४/२०२३ रोजीच्या आदेशान्वये फेटाळला आहे. तद्नंतर संबंधित याचिकाकर्ता/ अतिक्रमणधारक यांनी मा. मुंबई

उच्च न्यायालय येथे अपिल फ्रॉम ऑर्डर क्र. ३५७/२०२३ व इंटरीम ॲप्लीकेशन क्र. ४३६०/२०२३ अशा याचिका दाखल केल्या होत्या. तथापि, याचिकाकर्ता यांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत अर्ज दाखल केला असल्यामुळे याचिका मागे घेण्यास मान्यता देण्याची विनंती मा. मुंबई उच्च न्यायालयास केली होती. त्यानुसार या न्यायालयीन प्रकरणी मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक १९/०६/२०२३ रोजी आदेश पारित करुन सदर याचिका मागे घेण्याची मान्यता दिली आहे. त्यानुसार या प्रकरणी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २४७ अंतर्गत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात वृक्ष लागवड वनक्षेत्राचे प्रमाण २८ टक्क्यांवर नेण्याबाबत**

**(१०) ५१३११ (१९-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याची लोकसंख्या १३ कोटींच्या आसपास असताना केवळ १३ ते १४ टक्के वनक्षेत्र असून हे प्रमाण ३३ टक्के अपेक्षित असताना वन सर्वेक्षणानुसार सन २०२१ पर्यंत केवळ ३ टक्क्यांनी वनक्षेत्रात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात १७ टक्केपर्यंत वनक्षेत्र असले तरी पर्यावरणाचा समतोल राखण्याकरिता लोकसंख्येच्या तुलनेत हे प्रमाण अत्यंत कमी असून सलग वृक्ष लागवड केल्यास वनक्षेत्राचे प्रमाण २८ टक्क्यांवर जाईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे शासनाने निर्णय घेवून व मोहीम राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०८-२०२३) :**(१) हे खरे नाही.
राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या २१.१२ टक्के वनक्षेत्र आहे. भारतीय वन सर्वेक्षण विभागाकडून प्रकाशित होणाऱ्या " भारत वन स्थिती अहवाल" सन २०१५ व सन २०२१ अहवालाची तुलना केली असता राज्याच्या वनाच्छादनामध्ये (Forest Cover) ०.३३% तसेच वृक्षाच्छादन २१.०६% इतकी वाढ झालेली आहे.
(२) व (३) राष्ट्रीय वन नीती १९८८ नूसार वनाच्छादन/वृक्षाच्छादनाचे प्रमाण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के असावे. त्याकरीता अवनत वनक्षेत्रात तसेच वनेत्तर क्षेत्रात दरवर्षी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम घेतला जातो. सन २०१७ ते २०१९ या कालावधीत ५० कोटी वृक्ष लागवड मोहिमेत वन आणि वनेत्तर विभागाकडून एकूण ५४.५३ कोटी रोपांची लागवड करण्यात आली. अशा प्रकारे दरवर्षी घेण्यात येणाऱ्या वृक्षरोपनाच्या उपक्रमामुळे वनाच्छादनाच्या प्रमाणात वाढ होत आहे.
(४) अशी बाब नाही.

---

**गोळेगाव (ता.औंढा, जि.हिंगोली) येथील गुन्हा नोंद झालेल्या अवैध गौण खनिज उत्खन्न प्रकरणी चौकशी करुन दोषींवर कार्यवाही करण्याबाबत**

**(११) ५२३८६ (२७-०१-२०२३). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोळेगाव (ता.औंढा, जि.हिंगोली) येथील जेष्ठ नागरिक सौ.कलावती किशनराव गोरे यांच्या गट नं.९४ मधील

जमिनीवर त्यांच्या जमिनीलगत गट नं.९० मधील शामा कन्स्ट्रक्शन कंपनीचे खाण मालक यांनी खदान जमिनीचे सिमांकन क्षेत्र सोडून सदरील महिलेच्या जमिनीवर गौण खनिजाचे उत्खनन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीने विनापरवानगी, बेकायदेशीररित्या अवैध गौण खनिज उत्खन्नाने सदर महिलेच्या जमिनीत खोल व अवाढव्य खदान केली असून गौण खनिजीची चोरी केली असून यासंदर्भात सदर महिलेने प्रशासनाकडे सातत्याने तक्रारी करुनही सदरील कंपनीच्या मालकावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर प्रकरणातील आरोपींवर कारवाई करुन कंपनीवर अवैध उत्खननाबाबत ८ कोटींचा दंड वसुलीची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२२-०२-२०२३) :**(१), (२), (३) व (४) मौजे गोळेगांव, ता.औंढा ना., जि.हिंगोली येथील गट नं ९० चे संबंधीत खाण मालक यांनी त्याचा जमिनी लगत असलेल्या गट नं.९४ मधून गौण खनिजाचे उत्खनन केल्याचे निदर्शनास आले असता, कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, औंढा ना. यांनी केलेल्या मोजणीनुसार गट नं. ९४ मधुन १७३३९.३० ब्रास गौण खनिजाचे उत्खनन केल्याचे निर्दशनास आले. त्यानुषंगाने तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी औंढा (ना.) यांनी महसूल जमिन महसूल संहिता, १९६६ कलम ४८ (७) अन्वये दिनांक १४.१२.२०२१ च्या आदेशान्वये रू.०८,०६,२६,३५०/- इतक्या रकमेचे दंडात्मक आदेश पारित केले आहेत. तसेच सदर दंडात्मक रक्कमचा भरणा न केल्याने संबंधित खाण मालक यांच्य गा.न.नं.७/१२ गट नं. ९० वर बोजा चढविण्यात आला आहे.

गट नं. ९४ चे संबंधित मालक यांनी पोलीस स्टेशन, औढा ना. येथे दिलेल्या फिर्यादीवरून संबंधित खाणमालक यांच्याविरूध्द गु.र.क्र.००९५/२०२२ भा.द.वि.कलम ३७९,४४७,४२७,३४ व महारष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८ (७) व (८) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

**राज्यातील वन विभागातील ११५८ पात्र वन मजुरांना नियुक्ती देण्याबाबत**

**(१२) ५२९०३ (२७-०१-२०२३). श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वन विकास महामंडळातील मजुरांना शासन निर्णयानुसार कायम नियुक्ती देण्याच्या मागणीसाठी राष्ट्रीय मानवाधिकार संसाधन विकास संस्थेचे अध्यक्ष शेखर जनबंधू यांनी विविध न्यायालयात प्रकरण दाखल केले असून राज्य माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठाने प्रकरण २९८/२०१५ मध्ये दिनांक ८ सप्टेंबर, २०१६ रोजी आदेश देऊन वन मजुर शासन निर्णयानुसार पात्र असल्याचे आदेशात नमूद केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यस, वन विकास महामंडळातील नागपूर, कोल्हापूर, ठाणे, किनवट, भंडारा व इतर सर्व विभागातील तक्रारकर्ते व पात्र ११५८ वन मजुरांना कायम नियुक्ती देण्याबाबत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने शासनास सूचना दिल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार वन विभागातील ११५८ पात्र वन मजुरांना नियुक्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०७-२०२३)** : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घाटकोपर व मानखूर्द लिंक (मुंबई) रोडवर भूमाफीयांनी अनधिकृत बांधकाम केल्याबाबत**

**(१३) ५५१६२ (१८-०१-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर व मानखूर्द लिंक (मंबई) रोडवर भूमाफीयांनी शासकीय अधिकारी यांच्या संगनमताने अनधिकृतपणे गोडाऊन्सचे बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित भूमाफीयांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१९-०७-२०२३) :** (१) मुंबईतील घाटकोपर, मानखुर्द लिंग रोड अनधिकृतपणे गोडावूनचे बांधकाम केल्याची बाब ही खरी आहे. तथापि, शासकीय अधिकारी यांच्या संगनमताने अनधिकृत गोडाऊनचे बांधकाम केले ही बाब खरी नाही.

(२) होय, चौकशी केली आहे.

(३) व (४) मौजे चेंबूर, ता. कुर्ला येथील न.भू.क्र.३४३ व ८२३ अ मधील २३००० चौ.मी. शासकीय जमीन शासनाने माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेस निवासी प्रयोजनार्थ मंजूर केली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाने सदर मिळकतीचा ताबा दिनांक २५/०२/२००७ रोजी संबंधित संस्थेस दिलेला आहे.

संस्थेस प्रदान केलेल्या सदरहू मिळकतीवर अतिक्रमण होत असल्याचे संस्थेने निदर्शनास आणल्याने संस्थेच्या विनंतीनुसार उप जिल्हाधिकारी (अतिक्रमण / निष्कासन), चेंबूर यांनी दिनांक २०/०४/२०१७ रोजी या मिळकतीवरील २१३ झापेड्यांचे निष्कासन करुन मोकळ्या जागेचा ताबा माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेस देण्यात आला होता. तद्नंतर दिनांक १५/११/२०२२ रोजी ७ नव्याने तयार झालेल्या व्यावसायिक गाळयांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे. शासनाने सदरहू जमीन माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेस प्रदान केलेली असून उप जिल्हाधिकारी (अति./ निष्का.) यांच्याकडून अनेकवेळा बेकायदेशीर बांधकामे/ अतिक्रमणे निष्कासनाची कार्यवाही करण्यात आलेली आहेत. अतिक्रमण निष्कासन केल्यानंतर त्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होत असल्याचे दिसून येते. शासनाने प्रदान केलेल्या जमिनीचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी संबंधित माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेची आहे.

---

**राज्यातील इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राहण्याची सोय म्हाडाने करण्याबाबत**

**(१४) ५६६०२ (२७-०४-२०२३). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इतर मागास प्रवर्गातील अनेक विद्यार्थी शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळू न शकल्याने व शहरात राहण्याची इतर सोय नसल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पार्श्वभूमीवर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अर्थात एसआरए कडून २ हजार कोटी चे कर्ज एक टक्का दराने उपलब्ध करून द्यावे अशी मागणी म्हाडाने राज्य सरकारकडे केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनातर्फे चौकशी करण्यात आली आहे काय, तसेच विद्यार्थ्यांना शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने त्यांच्या राहण्याची व्यवस्था करण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०४-०९-२०२३) :** (१), (२) व (३) जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासनाने स्वत: इमारत भाडयाने घेवून जिल्हानिहाय वसतीगृहे कार्यान्वित करण्याचा शासन निर्णय दिनांक २८.०२.२०२३ अन्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

तसेच, २ हजार कोटी ची कर्ज मागणी ही म्हाडा अंतर्गत नायगाव, वरळी, एन. एम. जोशी मार्ग (दादर) येथील बी. डी. डी. चाळीच्या पुनर्विकासासाठी आवश्यक असणारा निधी उभारण्यासाठी करण्यात आलेली असून सदर कर्जाची मागणी ही राज्यातील इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यासाठी राहण्याची सोय करण्यासाठी केलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माण-मारुंजी (जि.पुणे) येथील जंगलाला भीषण आग लागल्याबाबत

**(१५) ५६९०८ (१९-०४-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माण-मारुंजी (जि.पुणे) येथील जंगलात दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास भीषण आग लागल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आग कशामुळे लागली व आगीमध्ये झालेल्या हानीचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन उक्त लागलेल्या आगीबाबत तसेच याप्रकरणी दोषी व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०८-२०२३) :** (१) पुण्यातील मुळशी तालुक्यातील मौजे माण येथील खाजगी क्षेत्रात लागलेल्या आगीचा प्रसार मौजे मारुंजी (जि.पुणे) फॉ.क.नं.१६६ मधील जंगलातील वनक्षेत्रात आल्याचे निदर्शनास आले होते.

(२) मौजे, माण या गावाच्या खाजगी क्षेत्रातुन आग पसरल्याने आगीचे कारण समजू शकले नाही. सदर आगीमुळे वनक्षेत्रातील अंदाजे १.५ हेक्टर क्षेत्रातील वाळलेले गवत व पाला पाचोळा जळाला आहे. मात्र वृक्षांवर आगीची झळ पोहोचलेली नाही. ह्या आगीबाबत फायर अलर्ट संदेश प्राप्त होताच वन कर्मचारी/अधिकारी यांनी घटनास्थळी जाऊन आग तात्काळ विझविलेली आहे.

(३) मौजे, माण या गावाच्या खाजगी क्षेत्रातून आग पसरल्याने आगीचे कारण समजू न शकल्याने तसेच दोषी व्यक्ती आढळून न आल्याने कारवाई करणे शक्य झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूरमधील जागा वनीकरणासाठी देण्याबाबत

**(१६) ५७०१५ (२१-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील गायमुख ते खारेगाव कोस्टल रोडच्या कामामुळे कांदळवन क्षेत्र बाधित होत असल्याने चंद्रपूर मधील जागा वनीकरणासाठी शोधण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात आतापर्यंत शासनाने कोणता पाठपुरावा केला आहे तसेच त्याची फलनिष्पत्ती काय आहे व याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०८-२०२३) :** (१) व (२) ठाणे बाळकुम ते गायमुख रस्त्याच्या कामासाठी बाधित होणारे १२.२६०७ हे. कांदळवन क्षेत्र वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळतीकरणाचा प्रस्ताव राज्य शासनाने दि.२७.०३.२०२३ रोजी केंद्र शासनास पाठविला आहे. सदर प्रस्तावामध्ये मौ. कुकडहेटी, ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर येथील स. नं. ३४ मधील १५ हेक्टर क्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी निश्चित करण्याचे नियोजन होते. तथापि, सदर जमिनीवर वृक्षांची घनता ०.४ पेक्षा जास्त असल्याने गडचिरोली जिल्ह्यातील मौ.मेंढेबोडी येथील १५ हे. क्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी निश्चित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावरगाव (ता.निफाड, जि.नाशिक) येथील साठवण तलाव या योजनेसाठी गाळ व काळी माती उत्खननाची परवानगी मिळण्याबाबत

**(१७) ५७१११ (२१-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावरगाव (ता.निफाड, जि.नाशिक) येथील साठवण तलाव या योजनेसाठी वन तळ्यांमधून नियमानुसार देय गौण खनिज रक्कम भरणा करुन गाळ व काळी माती उत्खननाची परवानगी मिळण्याकरिता जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग नाशिक यांनी दिनांक ४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास उपवनसंरक्षक, नाशिक पूर्व यांचेकडे परवानगी मिळण्यासाठी प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी लोकसहभागाने तळयातून गाळ काढण्यासाठी शासन प्रोत्साहन देत असल्यामुळे गाळ व काळी माती उत्खननासाठी वन विभागाने मृद व जलसंधारण विभागाला परवानगी द्यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.वने मंत्री, महाराष्ट्र राज्य व उपवनसंरक्षक, नाशिक पूर्व यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यानुषंगाने वनविभागाच्या वनतळयांमधून मृद व जलसंधारण विभागाकडून सुरु असलेल्या साठवण तलावाच्या कामासाठी काळी माती उत्खनन करण्यासाठी परवानगी देण्याकरिता वनविभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०८-२०२३) :** (१), (२) व (३) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नाशिक यांनी दिनांक ०४.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये साठवण तलावासाठी गाळ व काळी माती उत्खननाची परवानगी मिळण्याची विनंती केली होती. मा. लोकप्रतिनिधींनी देखील दिनांक २०.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सावरगाव साठवण तलावाच्या कामासाठी वन विभागाच्या वनतळयांमधून गाळ /काळी माती उत्खननाची परवानगी देण्याची मा. मंत्री (वने) यांना विनंती केली आहे.

वन जमिनीला वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या तरतूदी आत्कृष्ट करत असल्याने वन विभागाने वनक्षेत्रातील तलावांमधून गाळ काढण्यास परवानगी देण्याबाबत केंद्र शासनास यापूर्वी विनंती केली होती. केंद्र शासनाने वनक्षेत्रातील गाळ वनेतर कामांसाठी वापरावयाचा झाल्यास वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वनजमीन वळतीकरणाचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेस्तव सादर करणे आवश्यक राहील व प्रकरणपरत्वे त्यावर निर्णय घेता येईल, असे कळविले आहे. प्रकल्प यंत्रणेने वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रस्ताव सादर केल्यास सदर प्रस्ताव केंद्र शासनास पाठविणे शक्य होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर (ता.दक्षिण सोलापूर) जिल्ह्यातील शेत शिवारात जाण्याकरीता पाणंद रस्ते तयार करण्याबाबत**

**(१८) ५७९६९ (२२-०४-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर (ता.दक्षिण सोलापूर) जिल्ह्यातील अनेक शेत शिवारात जाण्याकरीता पाणंद रस्ते नसल्याने शेतकऱ्यांना तथा गावकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील वर्षी मातोश्री पाणंद रस्ते योजनेंतर्गत अनेक ठिकाणी पाणंद रस्ते मंजूर करण्यात आले असून त्यातील एकाही रस्त्याच्या कामास अद्याप सुरुवात झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच यंदाच्या खरीप हंगामामध्ये तीन ते चार वेळा अतिवृष्टी झाली त्यात पाणंद रस्ते नसल्याने शेतकरी शेतमजूर बैलगाडी जाण्याच्या वादातून अनेक गावात व शेजारील शेतकऱ्यांमध्ये तीव्र संघर्ष होत असतानाही मंजूर पाणंद रस्त्याची कामे सुरु न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त कारणानुसार पाणंद रस्त्याची कामे त्वरित सुरु करुन रस्ता मंजुरी संदर्भातील अनेक जाचक अटी कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२६-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे

(२) होय, हे खरे आहे.

(३) शासन निर्णयानुसार २० फुट रस्ता आवश्यक आहे. शेतकऱ्यांची १०० टक्के सहमती मिळण्यासही अडथळा आहे. रस्त्यावर अतिक्रमण असल्यामुळे, तसेच, मनरेगा आणि राज्य रोहयो यांच्या अभिसरणातुन योजना राबविण्यात येत असल्याने नोंदणीकृत मजुरांकडून कामाची मागणी नुसार रस्त्यांच्या कामांमध्ये प्रगती होते. तसेच कामांचा वार्षिककृती आराखडया मध्ये समावेश करण्याची कार्यवाही देखील करणे आवश्यक आहे.

(४) दक्षिण सोलापूर तालुक्यामधील मंजूर आराखड्यातील एकुण ४१ कामांचे प्रस्ताव संबंधीत अंमलबजावणी यंत्रणांकडे पाठविण्यात आले आहेत. तसेच, सदर कामे सुरू करणेबाबत क्षेत्रीयस्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चुंचाले (ता.यावल, जि.जळगाव) येथील ग्रामरोजगार सेवकांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत**

**(१९) ५८२६४ (२४-०४-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चुंचाले (ता.यावल, जि.जळगाव) येथील ग्रामरोजगार सेवक संघटना, महाराष्ट्र राज्य यांनी ग्रामरोजगार सेवकांच्या विविध प्रलंबित असलेल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी संबंधिताकडे दिनांक. १२ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामरोजगार सेवकांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संदीपानराव भुमरे (२७-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उदभवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांचे ठिबक अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(२०) ५८२८९ (२२-०४-२०२३). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात सन २०२१-२२ या कालावधीत ३५ शेतकऱ्यांचे सुमारे २५ लाख व सन २०२२-२३ या कालावधीत सुमारे १००० शेतकऱ्यांचे सुमारे दीड कोटी रुपये ठिबक अनुदान प्रलंबित असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी ठिबक अनुदान मिळण्यासाठी शेतकरी कृषी विभागात ये-जा करीत असून त्वरित अनुदान मिळावे, अशी मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन अनुदानापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना ठिबक अनुदान अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०५-०९-२०२३) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

सन २०२१-२२ मधील २२०० शेतकऱ्यांना ६.७९ कोटी अनुदान अदा करण्यात आले आहे. या वर्षामध्ये अनुदानासाठी लाभार्थी प्रलंबीत नाही.

सन २०२२-२३ मध्ये १४६५ शेतकऱ्यांना रु.४.५१ कोटी अनुदान अदा करण्यात आले असून अनुदानास पात्र ठरलेल्या ३८९ शेतकऱ्यांना अनुदान अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाज्योतीच्या नाशिक विभागीय कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत

**(२१) ५८३१८ (२१-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाज्योती नागपूर या संस्थेकरिता नाशिक येथे विभागीय कार्यालय तसेच निवासी प्रशिक्षण केंद्र व इतर सुविधा निर्माण करण्यासाठी उक्त शहरातील भू.क्र.११७ मधील क्षेत्र १२.४७ पैकी २ हेक्टर जागा उपलब्ध करून देण्याबाबत विभागीय आयुक्त नाशिक यांनी दिनांक २५ ऑगस्ट २०२२ रोजी वा त्यासुमारास अपर मुख्य सचिव, महसूल यांना प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरातील प्रस्तावाला मान्यता देवून महाज्योतीच्या विभागीय कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२६-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

महाज्योती, नागपूर या संस्थेकरीता नाशिक येथे विभागीय कार्यालय तसेच निवासी प्रशिक्षण केंद्र व इतर सुविधा निर्माण करण्यासाठी मौजे नाशिक येथील ग.नं. ११७ मधील शासनाच्या उपलब्ध १२.४७ हे. आर जागेपैकी २.०० हे. आर जागा प्रदान करण्याचा प्रस्ताव प्राप्त झाला असून आवश्यक छाननीअंती पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकरदन (जि.जालना) वन विभागाच्या काही भागात अवैध वृक्षतोड सुरु असल्याबाबत**

**(२२) ५८४२४ (२२-०४-२०२३). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (जि.जालना) वन विभागाच्या काही भागात पिंपळगाव, रेणुकाई, पारथ, रेलगांव, सावंगी, अवघडराव, शेलूद आदि रस्त्यावरील वनविभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येत असलेल्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अवैध वृक्षतोड सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात उक्त वृक्षतोड करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक जनता, वृक्षप्रेमी व जागरुक नागरिक यांच्याकडून माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वन क्षेत्रात विनापरवानगी रात्री मशीनच्या सहाय्याने वृक्षतोड व वाहतुकही केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या वन अधिकारी व पोलीस प्रशासनासह महसूल अधिकाऱ्यांवर शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर प्रशासकीय व दंडाधिकारी कारवाई करण्याकरिता तसेच अवैध वृक्षतोडीवर आळा घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०८-२०२३) :** (१) वन विभागाचे हद्दीतुन जाणाऱ्या कोणत्याही रत्यावर वृक्षतोड झालेली नाही, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येत असलेल्या रस्त्यावरील वृक्षतोड निदर्शनास आलेली नाही. त्यामुळे वनगुन्हे नोंद झालेले नाहीत.

(२) स्थानीक जनता वृक्षप्रेमी व जागरुक नागरीक यांच्याकडून माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान वृक्षतोड करणाऱ्यांवर कारवाई करणेबाबतची मागणी प्राप्त झालेल्या नाहीत.

(३) वनक्षेत्रात कोणतीही अवैध वृक्षतोड व वाहतुक निदर्शनास आलेली नाही.

(४) वनक्षेत्रात कोणतीही अवैध वृक्षतोड निदर्शनास आलेली नसल्याने दुर्लक्ष करणाऱ्या वन विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करता आलेली नाही. तसेच मालकी क्षेत्रातील वृक्षतोडीबाबत पोलीस, प्रशासन व महसुल अधिकारी यांच्यावर केलेल्या कारवाईबाबतची बाब वन विभागाच्या अखत्यारित नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वेल्हाळे (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथील क्षेत्र बेकायदा हस्तांतरीत केल्याबाबत**

**(२३) ५८६५९ (२१-०४-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वेल्हाळे (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथील गट नं. ४५६/१६ चे क्षेत्र ३ हे. ६४ आर. बेकायदा हस्तांतरीत केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त माहिती स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये मा.अमुस (महसूल) यांच्या निदर्शनास आणून दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२७-०७-२०२३) : (**१), (२) व (३) मौजे (ता.भुसावळ, जि. जळगांव) वेल्हाळे येथील गट नं. ४५६/१६ चे क्षेत्र ३ हे.६४ आर. बेकायदा हस्तांतरीत झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.१०.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये निदर्शनास आणून दिलेले आहे.

विभागीय आयुक्त, नाशिक यांनी प्रस्तावित केल्यानुसार तत्कालीन उपविभागीय अधिकारी, भुसावळ यांनी केलेल्या गैरवर्तणुकीच्या अनुषंगाने म.ना.से. (शिस्त व अपील) नियम, १९७९ चे नियम ०८ अन्वये त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.
(४) अशी बाब नाही.

---

## पालघर जिल्ह्यात विविध पायाभूत प्रकल्पांमुळे जमीन मालकांना मोठ्या प्रमाणात अडचणी येत असल्याबाबत

**(२४) ५८७८० (०९-०५-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात विविध पायाभूत प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या जमीन मालकांना मिळालेला मोबदला बँकेतून काढताना मोठ्या प्रमाणात अडचणी येत असून बोईसर मधील बँकेने फसवणूक केल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील मोबदला काढण्याकरिता बँकेतील कर्मचारी बँकेच्या शाखेत विमा, मेडीक्लेम, आवर्ती ठेव, फिक्स डिपॉझिट तसेच बँकेच्या विविध योजनांमध्ये गुंतवण्यासाठी आग्रह केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित बँकेवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२१-०७-२०२३) :** (१) पालघर जिल्ह्यात विविध पायाभूत प्रकल्पांसाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला थेट संबंधित खातेदारांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येतो. तद्नंतर मोबदला काढताना बँकेने फसवणूक केल्याबाबतची तक्रार जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात प्राप्त झालेली नाही..
(२) अशी बाब आढळून आलेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत अत्याधुनिक चित्रपटसृष्टी उभारण्याबाबत व राज्यातील पर्यटन स्थळे विकसित करण्याबाबत

**(२५) ५९५४५ (०९-०५-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील ५२१ एकर जागेवर अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेली चित्रपटसृष्टी (फिल्मसिटी) उभारण्यात येणार असल्याचे मा. पर्यटन व सांस्कृतिक कार्यमंत्री यांनी प्रसारमाध्यमांसमोर सांगितले असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई विमानतळावर येणाऱ्या पर्यटकांसाठी व्यवस्था विकसित करण्याचा व १०४ चौरस कि.मी चा असलेला पार्क व त्यासोबत चित्रपटाच्या चित्रिकरणासाठी राज्यातील ६५ पर्यटन स्थळे सोयी सुविधांसह विकसित करण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचेही मा. मंत्री महोदयांनी निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक विकास कार्यक्रमामधील मंजूर परंतु प्रलंबित असलेली नाशिक चित्रपटसृष्टी निर्माण करण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भारतीय सिनेमा सृष्टीच्या अमुल्य वारसा चालवणारी दादासाहेब फाळके चित्रनगरीला अत्याधुनिक व अद्यायावत सोयीसुविधा युक्त उभारण्याच्या दृष्टीने आवश्यक निधीची तरतुद करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, अत्याधुनिक चित्रपटसृष्टी (फिल्मसिटी) मुंबईत कोणत्या ठिकाणी उभारण्यात येणार आहे व राज्यातील ६५ पर्यटन स्थळे विकसित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१९-०७-२०२३) :** (१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे.
महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, दादासाहेब फाळके चित्रनगरी गोरेगाव, मुंबई या महामंडळास सन १९७७ मध्ये चित्रनगरीकरीता ५२१ एकर जमीन प्रदान केलेली असून, विविध योजनेतून चित्रनगरीच्या आधुनिकीकरणाची कार्यवाही सुरु आहे. सद्यस्थितीत आधुनिक तंत्रज्ञान असलेली चित्रपटसृष्टी उभारण्याकरीता रु.१०० कोटीचा निधी देण्यात आला असून, विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन निविदेची प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे.
(५) राज्यातील पर्यटनस्थळे (Eco Tourism Spots) बाबतची पुस्तिका व सॉफ्टकॉपी Maharashtra Eco Tourism Development Board, Nagpur (वन विभाग) यांच्याकडून महामंडळास प्राप्त झाली असून सदरची माहिती महामंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. निर्मिती संस्थांनी चित्रीकरणासाठी उपलब्ध जागांची मागणी केल्यास, वन विभागास कळविण्यात येईल. जेणेकरुन महाराष्ट्रातील विविध पर्यटन स्थळांवर चित्रीकरण होईल व त्याद्वारे रोजगार निर्मितीसह उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होईल.

---

### जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी विकासकाकडून थकीत रक्कम वसुल करण्याचे दिलेले आदेश

**(२६) ६०४३६ (२१-०४-२०२३). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक २१ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या आदेशान्वये श्री.संतोष साबळे व इतर विरूध्द श्री.निरज मनसुखलाल वेद (विकासक), गृहप्रकल्पात सदनिका बुकिंगसाठी लाखो रूपये घेवून फसवणूक केल्याप्रकरणी थकीत रक्कम, त्यावर १०.०५ टक्के सरळ व्याज रक्कम वसुल करण्याचे तहसीलदार, कुर्ला यांना आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हाधिकारी यांच्या आदेशाची तहसिलदार यांच्यामार्फत अद्याप अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन जिल्हाधिकारी यांच्या आदेशाची अमंलबजावणी करण्याबाबत तसेच सदर प्रकरणी दिरंगाई करणाऱ्या संबंधितांविरुध्द कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१९-०७-२०२३) :**(१) या प्रकरणी महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण, मुंबई (महारेरा) यांनी दिनांक २२/०७/२०१९ रोजीच्या पारित केलेले आदेश व दिनांक ३१/०७/२०१९ रोजी थकीत जमीन महसूल व त्यावरील उपकर वसुलीबाबत जारी केलेल्या प्रमाणपत्रानुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक २१/०९/२०१९ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम-१७६ ते २२३ मधील तरतुदीनुसार विकासक श्री. निरज मनसुखलाल वेद, यांची कुर्ला तालुक्याच्या कार्यक्षेत्रात असलेली स्थावर व जंगम मालमत्ता जमीन महसूल व त्यावरील उपकराच्या थकबाकीची वसुलीसाठी तहसिलदार, कुर्ला यांना प्राधिकृत केले आहे.
(२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी तहसिलदार, कुर्ला यांनी विकासकास दिनांक ०२/११/२०१९ रोजी व दिनांक ०३/०१/२०२० रोजी अनुक्रमे नमुना-१ (नियम-५) व नमुना-२ (नियम-६) याप्रमाणे दोन नोटीसा बजावल्या आहेत. तथापि, विकासकाने थकीत जमीन महसूल व उपकराची रक्कम भरणा न केल्याने महाराष्ट्र स्थावर संपदा नियमाक प्राधिकरण, मुंबई (महारेरा) यांनी दिनांक १४/०२/२०२० रोजी विकासकाची बी-३३३, कैलाश प्लाझा, वल्लभ बाग मार्ग, ऑफ ओडेन थेटर, घाटकोपर (पूर्व), मुंबई-७५ येथील स्थावर मालमत्तेच्या जप्तीचे आदेश पारित केले. परंतु, सदरची मालमत्ता भाडेपट्ट्याची असल्याने तहसिलदार, कुर्ला यांना जप्तीची कारवाई करता आली नाही. तसेच विकासकाच्या

नावे घाटकोपर येथील सहकारी बँकेची ३ व खाजगी बँकेची २ अशी एकूण ५ बँक खाती गोठविण्याचे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक १३/०७/२०२१ रोजी आदेश पारित केले. परंतु बँकेत पुरेशी रक्कम नसल्याने बँक खात्यातूनही वसुली होऊ शकली नाही.

त्यामुळे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक २८/१०/२०२१ रोजीच्या आदेशान्वये मौजे घाटकोपर (पूर्व) येथील श्रीजी टॉवर येथील स्थावर मालमत्तेच्या जप्तीबाबत आदेश पारित केले. यादरम्यान संबंधित विकासकाने रु.१,५८,०५,८००/- (रु. एक कोटी अठ्ठावन्न लाख पाच हजार आठशे) अधिक व्याज एवढया रक्कमेचे २४ बँकांचे धनादेश जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना दिले. परंतु विकासकाच्या खाती पुरेशी रक्कम नसल्याने, धनादेश वटले नाहीत.

यास्तव, तहसिलदार, कुर्ला यांनी दिनांक २९/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये विकासक यांची मौजे घाटकोपर (पूर्व) येथील श्रीजी टॉवर येथील स्थावर मालमत्तेच्या जप्तीसाठी पोलीस बंदोबस्त पुरविण्याचे पोलीस उपायुक्त (अभियान) बंदोबस्त शाखा, कॉफर्ड मार्केट, मुंबई यांना कळविले असता, पोलीस बंदोबस्त मिळू शकला नाही.

विकासकाच्या स्थावर मालमत्ता (सदनिका) जप्तीच्या कार्यवाहीसाठी पोलीस बंदोबस्त मिळावा म्हणून जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालय हे पोलीस उपायुक्त (अभियान) बंदोबस्त शाखा यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा करीत असल्याने पोलीस उपायुक्त (अभियान) बंदोबस्त शाखा यांनी दिनांक ०७/०७/२०२२ रोजी पोलीस बंदोबस्त पुरविल्याने तहसलिदार कुर्ला यांना विकासकाची मौजे घाटकोपर (पूर्व) येथील श्रीजी टॉवर येथील मालमत्ता जप्त करता आली. तहसिलदार, कुर्ला यांनी जप्त केलेल्या सदरहू मालमत्तेचे विकासकाने सील तोडून पुन्हा कब्जा केल्याने, विकासका विरुध्द दिनांक २९/०७/२०२२ रोजी टिळकनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र.०६५० दाखल केला आहे. सदरच्या जप्त केलेल्या मालमत्तेचे तहसिलदार, कुर्ला यांच्या स्तरावर जाहिर लिलाव करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**समान स्वरूपातील जमिनीच्या विक्रीची उदाहरणे (Sale Instances) उपलब्ध नसलेल्या प्रकरणी मुल्यांकनाबाबत**

**(२७) ६०६३९ (२१-०४-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समान स्वरूपातील जमिनीच्या विक्रीची उदाहरणे (Sale Instances) उपलब्ध नसलेल्या प्रकरणी मुल्यांकनाबाबत "महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या कलम ६९ अन्वये विहित केलेल्या महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ नुसार निर्गमित वार्षिक बाजारमूल्य दरानुसार जमिनीचे बाजारमूल्य निश्चित करण्यात यावे असा शासन निर्णय दिनांक २३ मे २०२२ रोजी वा त्यासुमारास महसूल व वन विभाग यांनी निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी ज्या भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्रकरणामध्ये गैरव्यवहार करण्यात आला आहे किंवा प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहे, अशा प्रकरणांचा यामध्ये समावेश करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत शासनाकडे भूसंपादनाबाबतची किती प्रकरणे प्रलंबित आहेत, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२५-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-१०/ २०१९/ प्र.क्र.१२०/ अ-२, दिनांक २३.०५.२०२२ रोजी निर्गमित केले आहे. त्यानुसार भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ कलम २६ (१) मधील तरतूदीनुसार संपादित करावयाच्या जमीनीचे बाजारमूल्य निर्धारित करताना २६ (१) (b) मध्ये नमूद केल्याप्रमाणे संपादित करावयाच्या जमिनीचे समप्रकारातील जमिनीच्या नोंदणीकृत विक्रीकराराची उदाहरणे उपलब्ध नसलेल्या परिस्थितीत, "महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या कलम ६९ अन्वये विहित केलेल्या महाराष्ट्र मुद्रांक

(मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ नुसार निर्गमित वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यातील दरानुसार जमिनीचे बाजारमूल्य निश्चित करण्यात यावे" असे निर्देश दिलेले आहेत.

(२) व (३) जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयातील मौजे माझगांव येथील भू. क्र.५९१, १/५९१ एलएक्यु ८३१ हे प्रकरण मा.न्यायालयात दाखल असुन रिट याचिका क्र.२३१९/२०२१ अंतिम निर्णयास्तव न्यायप्रविष्ठ आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे यांच्या अखत्यारीतील पालखी मार्ग, पुणे रिंग रोड, बारामती-लोणद रेल्वे, दौंड-मनमाड रेल्वे, पुणे-नाशिक महामार्ग इ. प्रकल्पांच्या भूसंपादनाची कार्यवाही विहित कालावधीत पुर्ण करण्यात येत आहे.

धुळे जिल्हयात १०८ प्रकरणे व अन्य जिल्हयात १३९ प्रकरणे प्रलंबित असुन नियमानुसार कार्यवाही सुरु आहे.

उर्वरीत अन्य विभागीय आयुक्तालय यांच्या अखत्यारीत असलेल्या जिल्हयामध्ये अशी बाब निदर्शनास आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाळीसगांव (जि.जळगांव) तालुक्यातील पर्यटन स्थळ असलेल्या पाटणादेवी पुलाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२८) ६०६८० (२५-०४-२०२३). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगांव (जि.जळगांव) तालुक्यातील पर्यटन स्थळ असलेल्या पाटणादेवी पुलाची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असून दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना जीव धोक्यात घालून पुलावरून जावे लागत असल्याने नवीन पुलाचे बांधकाम तातडीने करण्याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधींनी वारंवार मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी वनमंत्री यांनी सदर समस्या तातडीने मार्गी लावणे बाबत आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने उक्त पुलाचे बांधकाम त्वरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे. प्रश्नाधीन पुलाचे बांधकाम करण्याबाबत लोकप्रतिनिधी व वन विभागामार्फत भारतीय पुरातत्व विभाग, औरंगाबाद यांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे. या पुलाचे बांधकाम भारतीय पुरातत्व विभाग, औरंगाबाद यांच्यामार्फत आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील गटसचिव व कर्मचारी यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत

**(२९) ६०७०८ (०९-०५-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गटसचिव व कर्मचारी यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत मा.सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे दिनांक २३ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास बैठक झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीच्या अनुषंगाने गटसचिवांचे वेतन व सेवा विषयक प्रश्न, अनिष्ठ तफावत, प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्थांचे संगणीकरण व इतर व्यवसायातील अडचणींच्या अनुषंगाने उपस्थित झालेल्या मुद्यांच्या बाबतीत निर्गमित करण्यात आलेल्या इतिवृत्तावर विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबत आयुक्त सहकार यांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२७-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) गट सचिवांच्या सेवा व वेतनविषयक उपाय योजना सुचविण्यासाठी व त्या अनुषंगाने आवश्यक असल्यास सहकार कायद्यामध्ये दुरूस्ती करण्याबाबत शासनास शिफारशी करण्यासाठी सहकार आयुक्त यांनी दिनांक २८/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये डॉ. संजयकुमार भोसले, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. समितीने दिनांक २४/०४/२०२३ रोजी सहकार आयुक्त कार्यालयास अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाची सहकार आयुक्त कार्यालय स्तरावर छाननी चालू आहे.

प्राथमिक कृषी पत पुरवठा संस्थांना सक्षम व्यवसायीक उपक्रम राबविण्यासाठी केंद्र शासनाने केंद्र पुरस्कृत प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे संगणकीकरण योजनेस मान्यता दिली आहे. त्यानुसार राज्य शासनाने दिनांक ०७/१०/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये योजनेस मान्यता दिली असून योजनेअंतर्गत १२,००० संस्थांचे संगणकीकरण करण्याचे प्रस्तावित असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

केंद्र शासनाने तयार केलेल्या आदर्श उपविधी लागू करण्याबाबत दिनांक १६ मार्च, २०२३ रोजीच्या पत्रान्वये सहकार आयुक्तांना निर्देश दिले आहेत.

विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची अनिष्ठ तफावत कमी करण्याच्या दृष्टीने एकरकमी कर्ज परतफेड योजनेच्या (OTS) प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर येथील उपविभागीय अधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३०) ६०८६३ (२१-०४-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील श्री.हेमंत निकम, उपविभागीय अधिकारी क्र.१ यांच्या गैरव्यवहाराबाबत शासनाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत, जिल्हाधिकारी, सोलापूर व विभागीय आयुक्त, पुणे यांनी केलेल्या चौकशीत तथ्य आढळून आल्याने उपविभागीय अधिकारी यांनी अधिकाराचा गैरवापर केल्याचा निष्कर्ष काढून विभागीय आयुक्त यांनी शासनाकडे त्यांच्या अधिक सखोल चौकशीची व त्यांची बदली अकार्यकारी पदावर करण्याची शिफारस दिनांक २ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले वा त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०१-०९-२०२३) :** (१) व (२) श्री. निकम यांच्याविरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव प्राप्त झाला असून त्यावर कार्यवाही सुरु आहे. उपविभागीय अधिकारी क्र. १ सोलापूर या पदावर अन्य अधिकाऱ्याची पदस्थापना करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वर्धा जिल्ह्यातील भूकर मापक पैसे घेऊन खाजगी मोजणीसाठी जात असल्याबाबत

**(३१) ६१०६५ (२१-०४-२०२३). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील आठही तालुक्यात भूमी अभिलेख कार्यालये असून त्यात ३० भूकर मापकांची पदे मंजूर असून भूमी अभिलेख विभागाकडे २,०४३ मोजणीची प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विभागातील भूकर मापक सुट्टीच्या दिवशी पैसे घेऊन खाजगी मोजणीसाठी जात असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन दोषी आढळणाऱ्या भूकर मापकांविरुध्द कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३१-०८-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
वर्धा जिल्ह्यात माहे मे, २०२३ अखेर २३५४ मोजणी प्रकरणे प्रलंबित आहेत.
(२) हे खरे नाही.
उप अधीक्षक भूमि अभिलेख, कार्यालयातील भूकरमापक सुट्टीच्या दिवशी पैसे घेऊन खाजगी मोजणीसाठी जात असल्याबाबत निदर्शनास आले नाही अथवा अशी कुठलीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डहाणू शहरात कोळंबी प्रकल्पांच्या अनधिकृत विस्ताराबाबत

**(३२) ६१२२१ (१९-०४-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पालघर जिल्ह्यातील डहाणू शहरात भाडेतत्त्वावर दिलेल्या कोळंबी प्रकल्प आणि दिलेल्या क्षेत्रापेक्षा अधिक खाजण जागेवर अनधिकृत विस्तार केला असल्याची माहिती माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, यामुळे डहाणू कोळंबी प्रकल्पासाठी अनेक गावात तीवरांची झाडेही तोडली जात असल्याने पर्यावरणाची हानी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधिनी दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी यांच्याकडे कारवाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त जिल्हयातील कोळंबी प्रकल्प विकसित करण्यात येत असताना नियम व अटींचे पालन करण्यासाठी कोणती यंत्रणा उभारली याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले,त्यानुषंगाने संबधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही. अशी कोणतीही तक्रार / निवेदन प्राप्त झालेले नाही.
(२) हे खरे नाही.
(३) याबाबतचे निवेदन आढळून आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई-बडोदा राष्ट्रीय महामार्गावर बोईसर पुर्वेकडील दगडखाणीत गौण खनिज उत्खननासाठी करण्यात येणाऱ्या भूसुरुंग स्फोटामुळे घरांना तडे गेल्याबाबत

**(३३) ६१८४७ (२१-०४-२०२३). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-बडोदा राष्ट्रीय महामार्गावर बोईसर पुर्वेकडील किराट गावातील दगडखाणीत गौण खनिज उत्खननासाठी करण्यात येणाऱ्या भूसुरुंग स्फोटामुळे जवळच्या आदिवासी पाडयातील नागरीकांच्या घरांना तडे गेल्याने घरे राहण्यासाठी धोकादायक झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूसुरुंग स्फोट करण्यासाठी बोअर मशीनचा बेकायदा वापर केला जात असून त्याकडे महसूल विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने दोषी आढळून येणाऱ्या ठेकेदारावर त्यांना मदत करणाऱ्या महसूल विभागातील अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२४-०८-२०२३) :** (१), (२), (३) व (४) पालघर तालुक्यात मुंबई वडोदरा या राष्ट्रीय महामार्ग निर्मितीचे काम मे. मोंटे कार्लो प्रोजेक्ट कंपनी तर्फे करण्यात येत असून सदरहू प्रकल्पाकरीता आवश्यक असलेल्या गौणखनिज उत्खनन व वाहतुक करणेची परवानगी उपविभागीय अधिकारी, पालघर व जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडून देण्यात आली आहे.

मौजे किराट येथील स्थळ पाहणीमध्ये मौजे बोरशेती येथील गट नं. १६१,१९६,१९८,१९९ येथील क्षेत्रातून १,००,००० ब्रास व किराट येथील गट नं. ३९१ मध्ये १०,००० ब्रास दगड उत्खनन करण्याकामी सबंधित कंपनीस जिल्हाधिकारी, पालघर यांनी अनुक्रमे दिनांक २८.०९.२०२२ व दिनांक २६.०८.२०२२ अन्वये परवानगी दिली आहे. मौजे बोरशेती येथील गट नं. १६१,१९६,१९८,१९९ लगत असलेल्या मौजे किराट (पवारपाडा) येथील ग्रामस्यांच्या घराची प्रत्यक्ष पाहणी केली असता एकुण २७ ग्रामस्थांच्या घराला तडा व भेगा गेल्याचे दिसून आले.

तसेच मौजे किराट (गेटीचापाडा) येथील गट नं. ३९१ ही उंच टेकडीची खडकाळ असून सदर जागेमध्ये जुनी दगडखान आहे. सदर रस्त्याचे काम करीत असताना रोड मार्जिन मध्ये येणारा टेकडीतील दगड कटींग करताना भुसुरुंग स्फोट (ब्लास्टींग) करण्यात येत आहे. त्यामुळे सदर गट नंबर ३९१ च्या जमिनीस लागून असलेल्या जाधवपाडा, गेटीचापाडा येथील रहिवाशांच्या घराला हादरे बसत असून घरांना तडा गेल्याचे दिसून आले आहे.

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या तरतूदीन्वये विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांनी दिनांक ०५.१२.२०२२ च्या पत्रान्वये सदर शासकीय प्रकल्पासाठी लागणारी माती/मुरूम/दगड या गौण खनिज रात्रीच्या वेळी उत्खनन व वाहतूक करण्यास अटी व शर्तीच्या अधीन परवानगी दिलेली आहे.

तहसिलदार, पालघर यांच्या चौकशी अहवालाचे अनुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक १७/०२/२०२३ च्या पत्रान्वये ब्लास्टिंगसाठी देण्यात आलेल्या मर्यादेप्रमाणेच ब्लास्टींग करणे व त्यासाठी दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे तसेच गावकऱ्यांना विश्वासात घेऊन नुकसान झालेल्या २६ घरांची दुरुस्ती करुन द्यावी व यापुढे अशा प्रकारच्या घटना या पुढे घडणार नाहीत याची खबरदारी घेण्या बाबत संबंधीत कंपनी यांना कळविणेत आलेले आहे.

---

**पाचोरा (जि.जळगांव) येथील सहा.निबंधक यांच्या गैरकारभाराची चौकशी होऊन कार्यवाही होण्याबाबत**

**(३४) ६२५३५ (०९-०५-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचोरा (जि.जळगाव) येथे श्री.नामदेव सुर्यवंशी, सहा.निबंधक यांच्या प्रशासकाच्या काळातील काही संस्थामध्ये झालेल्या गैरकारभाराची चौकशी होऊन कार्यवाही होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२३-०८-२०२३) :** (१) होय.
(२) उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने चौकशी करणेस्तव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव यांनी त्रिस्तरीय चौकशी समितीची नियुक्ती केली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त होताच त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यात C&M कंपनीने नियमबाहय पध्दतीने जमिनीची खरेदी केल्यामुळे त्या जमिनी मुळ मालकाला परत करण्याबाबत

**(३५) ६२७८९ (२१-०४-२०२३). अॅड.माणिकराव कोकाटे (सिन्नर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यात C&M कंपनीने नियमबाहय पध्दतीने जमिनीची खरेदी केली असल्याने त्या जमिनी मुळ मालकाला परत करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेल्या मागणीबाबतचे प्रकरण मागील अनेक वर्षे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीने सदरचे क्षेत्र विकण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनीने अनेक नियमांचे उल्लंघन केलेले असल्याने कंपनीविरुध्द कारवाई करण्यासदंर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) अपर विभागीय आयुक्त, नाशिक यांचे दिनांक २९/५/२०१३ रोजीच्या आदेशानुसार वाद मिळकतीचा वापर ज्या प्रयोजनासाठी जमीन खरेदी केली आहे, त्या प्रयोजनासाठी मुदतीत वापर केलेला असल्याने कंपनीच्या मिळकतींना अकृषीक आकारणी करून रक्कम भरून घेणेबाबत आदेशित केल्यानुसार तहसिलदार, सिन्नर यांनी कार्यवाही केली आहे. परंतु, सी. अॅन्ड एम.फार्मिंग लिमीटेड कंपनीने सदरची रक्कम शासनजमा न केल्याने तहसिलदार, सिन्नर यांचे जप्ती आदेशानुसार कंपनीच्या संचालकांचे नाव कमी करून संबंधीत ७/१२ वर महाराष्ट्र शासनाचे नाव दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी कायद्यांतर्गत ग्रामरोजगार सेवकांना नियमित वेतन देण्याबाबत

**(३६) ६३५७९ (२१-०४-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी कायद्यांतर्गत गावपातळीवर काम करणारे ग्रामरोजगार सेवक यांना कामाच्या प्रमाणात मानधन दिले जात असून ते अर्धवेळ कर्मचारी असल्याने कमी वेतन मिळत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मानधन कौटुंबिक उपजिविका भागात येत नसल्याने रोजगार सेवक यांना पूर्ण वेळ कर्मचारी म्हणून नियुक्ती व एकत्रित मासिक वेतन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.रोजगार हमी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी राज्यात एकूण किती रोजगार सेवक कार्यरत असून मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२७-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही. ग्राम रोजगार सेवकांना मनुष्य दिवसांच्या निर्मितीनुसार मानधन दिले जाते.

(२) होय.
(३) व (४) राज्यात सद्यस्थितीत २६,६५९ ग्राम रोजगार सेवक कार्यरत आहेत व त्यांच्या मागणीच्या अनुषंगाने दिनांक २ मे, २०११ च्या शासन निर्णयान्वये ग्राम रोजगार सेवकांचे कामकाजाचे व मानधन देण्याबाबतची कार्यपध्दती विहित करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने दिनांक १६ मे,२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामरोजगार सेवकाच्या मानधन ठरविण्याच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

---

## बुलढाणा येथे सरकारी वनजमिनीवर झाडे जिवंत नसल्याने तसेच वृक्ष लागवडीच्या कामातील गैरकारभाराची चौकशी न केल्यास आत्मदहनाचा इशारा दिल्याबाबत

**(३७) ६३९१४ (२१-०४-२०२३). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा येथे वनविभाग यांच्या मालकीच्या सरकारी वनजमिनीवर झाडे जिवंत नसल्याबाबत तसेच खामगांव वनप्रकल्प विभागातील वृक्ष लागवडीच्या कामातील गैरकारभाराची चौकशी करुन कारवाई न केल्यास आत्मदहन करण्याचा इशारा मधुकर चोपडे, सेवानिवृत्त लेखा सहायक, मुक्ताईनगर, जळगांव यांनी दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास उपवनसंरक्षक, वन विभाग यांना लेखी निवेदनाद्वारे दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त लेखी निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-०८-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
उपवनसंरक्षक (प्रा.) बुलढाणा वनविभाग यांना श्री.मधुकर चोपडे, सेवानिवृत्त लेखासहायक, मुक्ताईनगर यांचे दिनांक १६.०२.२०२३ रोजीचे निवेदन प्राप्त झालेले आहे.
(२) प्रस्तुत तक्रारीचे अनुषंगाने केंद्रीय अन्वेषण ब्युरो (CBI) मार्फत प्राथमिक चौकशी पूर्ण झाली आहे. केंद्रीय अन्वेषण ब्युरो (CBI) यांचा प्राथमिक अहवाल शासनास प्राप्त झाला असून, शासनाचे विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई आरे येथील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेबाबत तसेच अतिक्रमण विरोधात आरेतील आदिवासी रहिवाशांवर केलेल्या कारवाईबाबत

**(३८) ६४०७८ (२१-०४-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई आरे येथील विकास कामे, झोपडपट्टी पुनर्विकास योजना तसेच अतिक्रमण विरोधात आरेतील आदिवासी रहिवाशांनी वांद्रे येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे,
(२) असल्यास, मुंबईतील आदिवासींचा मूळ व्यवसाय शेती असून शेत जमिनीचा मालकी हक्क त्यांच्याकडे राहू द्या, आदिवासी पाड्यांना गावठाण घोषित करा, आदिवासी जमिनी भूमी अभिलेखात नोंदणी करा, पाड्यांवर कॅम्प लावून जातीचे दाखले द्या, मूलभूत मानवी सुविधा दयाव्यात, पाणी, रस्ते, आरोग्य तसेच अंगणवाड्या आदी मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांच्यामार्फत शासनाला दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२५-०७-२०२३) :** (१), (२), (३) व (४) कष्टकरी शेतकरी संघटनेचे दिनांक ०६/०२/२०२३ रोजीचे निवेदन जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयास प्राप्त झाले आहे. निवेदनात विविध स्वरुपाच्या मागण्या आहेत. सदर मागण्या ह्या विविध कार्यालयांशी सबंधित असल्याने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाने त्यांच्या दिनांक २१/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये १) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई २) नियंत्रक, शिधावाटप मुंबई, ३) संचालक तथा उपवनसंरक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्याने, बोरीवली ४) उप विभागीय अधिकारी, मुंबई पूर्व/ पश्चिम उपनगर ५) जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, मुंबई उपनगर व ६) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, बोरीवली या कार्यालयांना त्यांच्याशी संबंधित मागणीच्या अनुषंगाने निवेदनाची प्रत कार्यवाहीसाठी पाठविली आहे.

आदिवासी मिळकती संदर्भात व सबंधित मिळकतीचे गाव नमुना नंबर ७/१२ मध्ये महाराष्ट्र जमीन महसूल सांहिता, १९६६ चे कलम ३६-अ नुसार नोंदी घेण्यात आल्या आहेत. तथापि, मुंबई उपनगर जिल्ह्यातील सर्व मिळकतींचे नगर भूमापन अंतर्गत मिळकत पत्रिका / अधिकार अभिलेख उपलब्ध आहेत. परंतु सदर मिळकतीच्या मिळकतपत्रिकेवर आदिवासी पाड्यातील जमिनीची नोंदणी भूमी अभिलेखात करण्याबाबतची कार्यवाही प्रस्तावित नाही. तसेच मुंबईतील आदिवासी पाड्यांना गावठाण घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

अंधेरी तालुक्यातील आदिवासी पाड्यास भेट देऊन माहे जानेवारी, २०२२ मध्ये जवळपास १०६ वारली जातीचे दाखले वितरीत केले आहेत. बोरीवली तालुक्यात माहे फेब्रुवारी, २०२३ पर्यंत ४९ आदिवासी पाड्यांमध्ये ८१ जातीचे दाखले देण्यात आले आहेत.

तसेच कुर्ला तालुक्यातील मौजे भांडूप हद्दीत पळसपाडा येथील आदिवासी समाजाच्या वस्तीमध्ये सन २०१८-१९ मध्ये शिबीराचे आयोजन करुन २३ जातीचे दाखले देण्यात आले आहेत. तसेच मौजे पास्पोली हद्दीत भाणशीला पाडा येथे सन २०२१-२२ मध्ये शिबीराचे आयोजन करुन ११९ जातीचे दाखले देण्यात आले आहेत. यापुढेही सदर आदिवासी पाडे व वस्त्यांवर कॅम्प लावून जातीचे दाखले देण्याची तजवीज जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाने ठेवली आहे.

---

**राज्यातील हजारो शेतकऱ्यांना सातबारा उताऱ्यावरील ३५ सेक्शनच्या जाचक अटीतून मुक्त करण्याबाबत**

**(३९) ६४९१५ (२७-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील हजारो शेतकऱ्यांना सातबारा उताऱ्यावरील ३५ सेक्शनच्या जाचक अटीतून मुक्तता मिळण्यासाठी मा.वने मंत्री, महाराष्ट्र राज्य व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासमवेत दिनांक ५ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास सर्व संबंधितांची बैठक घेतली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बैठकीमध्ये कोणता निर्णय घेतला व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, यासंदर्भात राज्यातील शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याने याबाबत निर्णय घेण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०९-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) प्रकरणी मा.मंत्री (वने) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३.४.२०२३ रोजी बैठक संपन्न झाली असून सदर बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आले आहेत:

१. महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ मध्ये सुधारणा करण्याची बाब धोरणात्मक असल्याने जलद निर्णय घेण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनासोबत मा.मंत्री महोदयांच्या स्तरावरुन चर्चा करण्यात येईल.

२. प्रस्तूत प्रकरणी न्यायालयाचे आदेश व कायद्यातील तरतूदी विचारात घेऊन पुढील दिशा अधिक स्पष्ट होण्याच्या दृष्टीने मा.विधानसभा सदस्यांसोबत पुन्हा सविस्तर चर्चा करण्यात येईल.

३. महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ मुळे बाधीत झालेल्या शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याच्या अनुषंगाने "One Window System" सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने विचार करण्यात येईल.

वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या सुधारणाबाबत संयुक्त संसदिय समितीकडे राज्य शासनाव्दारे शिफारशी सादर करण्यात आल्या होत्या.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाले (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) गावातील कुटुंबाच्या वडीलोपार्जित जमिनीवर मुरूम टाकून विकासकाने केलेले अतिक्रमण**

**(४०) ६५८४३ (२५-०८-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाले (ता.अंबरनाथ,जि.ठाणे) गावातील सर्वे नंबर ४५/२ या देसाई कुटुंबाच्या वडीलोपार्जित सुपिक जमिनीवर भराव टाकून एका रात्रीत मुरूम टाकून एका विकासकाने अतिक्रमण केल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अतिक्रमण करणाऱ्या विकासकावर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०४-०९-२०२३) :** (१), (२) व (३) तहसीलदार, अंबरनाथ यांनी मंडळ अधिकारी, अंबरनाथ यांचे मार्फत पाले (ता. अंबरनाथ, जि. ठाणे) गावातील सर्वे नंबर ४५/२ मधील उत्खननाबाबत चौकशी केली. सदर चौकशीत ६३७ ब्रास माती व दगड अनाधिकृत गौण खनिज उत्खनन/भराव/साठा केले बाबतचा पंचनामा अहवाल तहसीलदार, अंबरनाथ यांना सादर केला. त्यानुषंगाने तहसीलदार, अंबरनाथ यांनी दिनांक ०७.०७.२०२३ च्या आदेशान्वये संबंधिताविरूध्द रू.६८,१३,७१४/- एवढ्या दंडात्मक रकमेचे आदेश पारित केले आहेत.

---

**संग्रामपूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील रेती तस्करी करणाऱ्या विना नंबरच्या वाहनांना डिझेल व पेट्रोल देऊ नये असा लेखी आदेश काढल्याबाबत**

**(४१) ६६८०९ (२७-०८-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संग्रामपूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील रेती तस्करांचा गैरव्यवहार रोखण्याकरिता तसेच शासनाचे होत असलेले आर्थिक नुकसान टाळण्याकरिता विना नंबरच्या वाहनांना डिझेल व पेट्रोल देऊ नये असा लेखी आदेश दिनांक १७ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास तहसिलदारांनी पेट्रोल पंपधारकांना देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशानुसार विना नंबरच्या वाहनांना किती पेट्रोल पंपधारकांनी कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०४-०९-२०२३) :** (१), (२) व (३) जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी दिनांक १७.०५.२०२३ च्या पत्रान्वये संग्रामपूर तालुक्यात सर्व पेट्रोल पंप धारकांना विना नंबरच्या वाहनांना पेट्रोल व डिजेल न देण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

संग्रामपुर तालुक्यात पंप धारकांकडून विना नंबरच्या वाहनांना पेट्रोल दिले असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

---

## कोल्हेवाडी (ता.लांजा, जि. रत्नागिरी) येथे अनधिकृतरित्या दगड उत्खनन प्लांट उभारण्यास दिलेली परवानगी रद्द करण्याबाबत

**(४२) ६६९०८ (२८-०८-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हेवाडी (ता. लांजा, जि. रत्नागिरी) येथील रवी इंफ्राबिल्ड प्रोजेक्ट प्रा.लि.कंपनीच्यावतीने, सुनील विष्णू प्रसाद व श्रीवास्तव यांनी दगड उत्खनन करीता ग्रामपंचायतीकडे खडी(क्रशर) परवानगीसाठी दिनांक १८ जुलै, २०२२ रोजी परवागीकरीता पत्र दाखल केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विषय दिनांक २१ जुलै २०२२ रोजीच्या मासिक सभेमध्ये उपस्थितीत केला असता ग्रामपंचायत समितीने परवानगी न देता सदर विषय ग्रामसभेच्या कार्यक्रम पत्रिकेवर दाखवून विशेष ग्रामसभा घेऊन ग्रामस्थांच्या उपस्थितीत निर्णय घेण्याचे ठरविण्यात आले व सदर विषय दिनांक २१ जुलै, २०२२ रोजीच्या ग्रामसभेच्या बैठकीत घेण्यात आला व समस्त ग्रामस्थांनी खडी क्रशर प्रस्तावावर विरोध दर्शवून दगड उत्खननाला परवागी देण्यात येऊ नये असा क्र.०६ / ०२ असा ठराव करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामसभेचा ठराव होऊनही सरपंच, उपसरपंच आणि ग्रामसेवक यांनी विशिष्ट हेतूने प्रेरित होऊन ग्रामस्थांना विश्वासात न घेता तसेच कोणतीही विशेष ग्रामसभा न लावता मनमानी करुन व स्वार्थी हेतूने या क्रशरला ना हरकत दाखला परस्पर दिला हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक २७ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास ग्रामसभेमध्ये ग्रामस्थांनी याविरोधात आक्षेप नोंदविले, त्यानंतर सरपंचानी चुकीच्या पद्धतीने क्रशर प्लाटला दिलेली परवानगी रद्द करण्यात यावी, अशी मागणी माहे मार्च, २०२३ च्या ग्रामसभेत केली व त्याबाबतचे सविस्तर निवेदन ग्रामस्थांनी दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू निवेदनातील मागणी संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०४-०९-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) संबंधीत कंपनीने मौजे कोल्हेवाडी येथील ग.क्र.२५९, २६०,२६१,२६२, व २६६ या गटावर दगडाचे उत्खनन करण्याबाबत केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २२.०८.२०२२ रोजी झालेल्या ग्रामसभेत सदर कंपनीस दगड उत्खननास परवानगी देणेत येवू नये, तथापि, गामपंचायत बॉडीने आपल्या जबाबदारीवर मान्यतेचा निर्णय घेण्याचा ठराव मंजूर केला.

तदनंतर मौजे कोल्हेवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांनी दिनांक १५.१२.२०२२ रोजी गट क्र. २५९,२६०,२६१,२६२ व २६६ मधुन दगड उत्खनन करण्यास ना हरकत दाखला दिला. दिनांक २७.०३.२०२३ रोजी मौजे कोल्हेवाडी या ग्रामपंचायतीच्या झालेल्या ग्रामसभेमध्ये गावातील ग्रामस्थांनी संबंधीत कंपनीस देण्यात आलेला नाहरकत दाखला रद्द करण्याचा ठराव केल्यानंतर मौजे कोल्हेवाडीचे सरपंच यांनी दिनांक २८.०३.२०२३ रोजी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना संबंधित कंपनीस देण्यात आलेले ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात येऊन खडी क्रशर प्रकल्प सुरू न करण्याबाबत व परवानगी रद्द करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच मौजे कोल्हेवाडी ग्रामस्थांनी दिनांक ३१.०३.२०२३ रोजी मौजे कोल्हेवाडी येथील दगड उत्खनन (खडी क्रशर) यासाठी ग्रामस्थांचा विरोध असुन जन सुनावणी घेण्याबाबतच्या विषयाचे निवेदन जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना सादर केले आहे.

ग्रामसभेचा दगड उत्खननास विरोध असतानाही दिनांक १५.१२.२०२२ रोजी संबंधीत कंपनीस ना-हरकत दिल्याबाबत गट विकास अधिकारी, पंचायत समिती लांजा यांचेकडून दिनांक ०४.०७.२०२३ रोजी सरपंच, कोल्हेवाडी व तत्कालीन ग्रामसेवक यांना नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत.

---

## गवळाने व चुंचाळे परिसरामध्ये अंबड औद्योगिक वसाहतीतील एका कंपनीने ग्रीन झोन मधून मोठ्या प्रमाणावर गौण खनिज उत्खनन केल्याबाबत

**(४३) ६७००३ (२७-०८-२०२३). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गवळाने व चुंचाळे परिसरामध्ये अंबड औद्योगिक वसाहतीतील एका कंपनीने ग्रीन झोन मधून मोठ्या प्रमाणावर गौण खनिज उत्खनन केल्याबाबत दिनांक १४ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्या कंपनीच्या विरोधात योग्य ती कार्यवाही होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०४-०९-२०२३) :** (१), (२) व (३) मौजे अंबड खुर्द परिसरातील महाराष्ट्र औद्योगिक वसाहत महामंडळमधील प्लॉट क्र. डी ५८/३ मधील व वेअर हाऊस जवळील ओपन प्लॉट मध्ये अनधिकृत गौणखनिज उत्खनन केले असल्याबाबत तहसिलदार, नाशिक यांना प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या चौकशीमध्ये संबंधीत कंपनीने उत्खननाची परवानगी न घेता केलेल्या उत्खननाबाबत दिनांक २८.०६.२०२३ रोजी रू.२३,९३,९५०/- एवढया रकमेची दंडात्मक नोटीस संबंधीत कंपनीस बजाविण्यात आली आहे.

---

## दगडवाडी (जि.नांदेड) येथून कल्याण टोल इन्फ्रा लि.इंदोर यांनी अतिरिक्त दगड उत्खनन केल्याबाबत

**(४४) ६८१६८ (२७-०८-२०२३). श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हदगाव (जि.नांदेड) तालुक्यातील जांभळसावळी उत्खनन प्रकरण कारवाईस्तरावर प्रलंबित असताना याच तालुक्यातील दगडवाडी येथून कल्याण टोल इन्फ्रा लिमिटेड इंदोर ने सुमारे ७२ हजार १८७ ब्रास अतिरिक्त दगड खोदुन त्याची विक्री केल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,त्यानुषंगाने उत्खनन करणाऱ्या संबंधितांवर व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०४-०९-२०२३) :** (१), (२) व (३) मे. कल्याण टोल इन्फ्रास्ट्रक्चर, इंदोर या कंपनीने मौजे दगडवाडी, ता. हदगाव, जि. नांदेड येथील गट नं. ४४/१ व ४४/२ मधुन दगड व मुरूम या गौण खनिजाचे अवैध उत्खनन करत असल्याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांना प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने ई.टी.एस. मोजणी करण्यात आली. सदर ई.टी.एस. मोजणीमध्ये ७२१८७ ब्रास उत्खनन केल्याचे आढळून आले. त्यानुसार कंपनीने उत्खननास परवानगी घेतलेल्या ८३७९ ब्रास परिमाण वजा जाता उर्वरीत ६३८३८ ब्रास एवढ्या अतिरिक्त उत्खननाच्या अनुषंगाने संबंधीत कंपनी विरूध्द उपविभागीय दंडाधिकारी, हदगाव यांनी दिनांक ३१.०५.२०२३ रोजी रू.३५,७१,३४,३९४/- इतक्या रकमेचे दंडात्मक आदेश पारित करण्यात आले असून वसूलीची कार्यवाही सुरू आहे.

---

## अर्धापूर (जि.नांदेड) तालुक्यातील के. टी. आय. एल. या कंपनीने जास्त उत्खनन करुन कमी रॉयल्टी भरल्याबाबत

**(४५) ६८१७० (२७-०८-२०२३). श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्धापूर (जि.नांदेड) तालुक्यातील वारंगा-लोहार रस्त्यासाठी खाजगी जागेतून कल्याण टोल कंपनी अर्थात के. टी. आय. एल. या कंपनीने एकूण ९५ हजार ३७ ब्रास मुरुमाचे उत्खनन केले असले तरी केवळ ६ हजार ०६४ ब्रासची रॉयल्टी भरली असल्याचे हदगावच्या भूमी अभिलेख कार्यालयाने एटीएस मोजणी केल्यानंतर माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कारवाई करण्यासंर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०४-०९-२०२३) :** (१), (२) व (३) जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या अहवालानुसार मौजे जांभळसावली, ता. हदगाव, जि. नांदेड येथील गट नं.८७,८९,९० व ९१ मधुन झालेल्या उत्खनाच्या अनुषंगानी केलेल्या ई.टी.एस. मोजणी मध्ये ९५०३७.१२ ब्रास उत्खनन केल्याचे निदर्शनास आले. सदर परिमाणापैकी मे. के. टी. आय. एल. यांनी १९२१८.१२ ब्रास उत्खनन केलेले असुन त्यापैकी ५००० ब्रास चे परवाने घेण्यात आले असून, उर्वरीत १४,२१८.१२ ब्रास अतिरीक्त परवानगी व्यतीरीक्त उत्खनन केले असल्याचे निदर्शनास आले आहे.

तदनंतर उपविभागीय अधिकारी, हदगांव यांच्या दिनांक ०८.०५.२०२३ च्या आदेशान्वये तहसिलदार, हदगांव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली असुन, सदर समितीने सदर गटाची चौकशी करून यापुर्वी प्रत्यक्षात किती ब्रास उत्खनन अतिरिक्त गौण खनिज उत्खनन करण्यात आले आहे याबाबत चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. सदर समितीची चौकशी अद्याप सुरू आहे.

---

## मौजे गोरेगाव (ता. बोरिवली) या जीवन ज्योत सामाजिक संस्थेनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना दिलेले निवेदन

**(४६) ६८१७७ (०३-०९-२०२३). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गोरेगाव (ता. बोरिवली) या जीवन ज्योत सामाजिक संस्थेनी दिनांक १ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास सर्व्हे नंबर १०६ या जमिनीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्याकडे ३ कोटी ३४ लाख ५७ हजार रुपयाची थकबाकी वसूल करणे आणि अवैध उत्खननाची ११ कोटी १४ लाख सव्वीस हजार रुपये वसूल करण्याबाबत निवेदन दिले होते तसेच लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाच्या अनुषंगाने कारवाई करणे व माहिती देण्याचे पत्र दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनामध्ये नमूद केलेल्या जमिनीवर १३५८८ ब्रास अवैध उत्खनन केले आहे काय, तसेच ३ कोटी ३४ लाख ५७ हजार ९६ रुपयाची NA थकबाकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधी यांना जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी दिनांक १२ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनानुसार शासन निर्णयाप्रमाणे उपलब्ध करून दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निवेदनाप्रमाणे NA थकबाकी वसूल करणे, अवैध उत्खनन वसुली करणे, याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे, तसेच या प्रकरणात गैरव्यवहार करणाऱ्या, शासनाचा महसूल बुडविणाऱ्या अधिकाऱ्यांवर तसेच मा. सदस्यांना वेळेत माहिती न देणाऱ्या जबाबदार अधिकारी कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाच्या कारवाईसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) मौजे गोरेगांव ता बोरीवली येथील स.नं.१०६ पै, १११/१,१११/२ व इतर न.मु.क्र. १५८,१५९,१६०,१६१ पै, १६२ पै, १६५ पै. या क्षेत्रातून १३५८८ ब्रास अनाधिकृत उत्खनन केले असल्याचा अहवाल तलाठी, गोरेगांव यांनी तहसिलदार, बोरीवली यांना सादर केला. त्यानुषंगाने तहसिलदार, बोरीवली यांनी दिनांक २१.०१.२०२१ अन्वये रू.११,१४,२६,६७०/- एवढ्या दंडात्मक रकमेची नोटीस संबंधित कंपनिस बजाविण्यात आली असून, त्यानुषंगाने दिनांक ०७.०७.२०२३ रोजी सुनावनी आयोजीत केली आहे.

तसेच संबंधित कंपनीकडून तीन वर्षाचा बिनशेती आकाराबाबत असलेली रू.०३,३४,५७,०९६/- एवढी रकम भरण्यास दिनांक २६.०२.२०२१ व २४.०३.२०२१ रोजी नोटीस संबंधित कंपनिस देण्यात आली. महसूल व वन विभागाच्या क्र.एमएपी-२०२२/प्र.क्र.५०/ज-१अ, दिनांक ०७.०४.२०२२ अन्वये क्षेत्रीय स्वरावर करण्यात येणाऱ्या अकृषिक कराच्या आकारणीच्या वसुलीस पुढील आदेश होईपर्यंत तात्पुरती स्थगिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे संबंधित कंपनिकडून सदर बिनशेतीची आकार रक्कम वसूल करता आलेली नाही.

तसेच प्रस्तूत प्रकरणी संबंधित लोकप्रतिनिधी यांना दिनांक ०५.०७.२०२३ च्या पत्रान्वये अंतरिम अहवालाची वस्तुस्थिती कळविण्यात आलेली आहे.

---

## मौजे मागाठाणे (ता.बोरिवली) मुंबई उपनगर येथील गौण खनिजाचा ३०० कोटीचा महसूल बुडवल्याबाबत

**(४७) ६८३१२ (२८-०८-२०२३). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मागाठणे (ता. बोरिवली) येथील जीवन ज्योत सामाजिक संस्था यांनी दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास सर्व्हे नंबर १०७,१४१,१४२ या जमिनीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी MSD वांद्रे इस्ट, मुंबई यांच्याकडे अवैध गौण खनिज उत्खनन करून ३०० कोटीचा महसूल न भरल्याबाबतचे निवेदन दिले होते, तसेच लोकप्रतिनिधीनी दिनांक ९ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाच्या अनुषंगाने कारवाई करण्याबाबत पत्र दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनामध्ये नमूद केलेल्या जमिनीवर सुनील अरोरा स्काय सीटी ओबेरॉय बिल्डर या विकासाला महानगर पालिकेने RMC प्लॉटची परवानगी दिली होती सदर परवानगी नुसार त्यांनी सन २०१६ ते २०२३ या कालावधीमध्ये RMC प्लॉट चालवला असून या प्लॉटमध्ये गौण खनीज वापरले परंतू त्याची सुमारे ३०० कोटीची रॉयल्टी त्यांनी भरली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन्माननीय सदस्यांना जिल्हाधिकारी उपनगर जिल्हा यांनी दिनांक ९ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनानुसार २०२० च्या शासन निर्णयानुसार माहिती उपलब्ध करून दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाप्रमाणे थकबाकी वसूल करण्याबाबत तसेच गैरव्यवहार करणाऱ्या विरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०९-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) जीवन ज्योत सामाजिक संस्था यांनी मौजे मागाठणे, ता. बोरीवली १४१, १४२ या जमिनीच्या अनुषंगाने अवैध गौण खनिज उत्खनन करून ३०० कोटीचा महसूल न भरल्याबाबतचे निवेदन व लोकप्रतिनिधी यांच्याकडून जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना निवेदन प्राप्त झाले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने तहसिलदार, बोरीवली यांच्याकडून चौकशीची कार्यवाही सुरू आहे. तसेच संबंधीत लोकप्रतिनीधी यांना प्रस्तूत प्रकरणी दिनांक ०५.०७.२०२३ च्या पत्रान्वये अंतरिम अहवालाची वस्तूस्थिती कळविण्यात आलेली आहे.

---

## वाशिम अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या वाळू स्वामीत्वधन अपहार करुन शासनाचा महसूल बुडविल्याबाबत

**(४८) ६८७४१ (२५-०८-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या कार्यकाळात खाणपट्टा परवानगी, अर्ज प्रक्रिया शुल्क न आकारणे, वाळू स्वामीत्वधन अपहार झाल्यासंदर्भातील अहवाल शासनास माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालात करोडो रुपयाचा शासनाचा महसूल बुडविल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदरहु अहवालानुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०४-०९-२०२३) :** (१),(२), (३) व (४) तत्कालीन अतिरिक्त जिल्हाधिकारी, वाशिम श्री.नंदकुमार बेडसे यांनी खाणपट्टा परवानगी अर्ज प्रक्रिया शुल्क न आकारणे, वाळू स्वामित्वधन अपहार करून दोन कोटी रूपयाचा शासनाच्या महसूल बुडवल्याबाबतचा अहवाल माहे सष्टेंबर २०१७ वा त्या दरम्यान क्षेत्रीय यंत्रणेकडून सादर करण्यात आलेला नाही.

---

## देगलूर (जि.नांदेड) येथे 'घरपोच वाळू धोरण' योजनेअंतर्गत शासकीय वाळू नागरिकांसाठी खुली करण्यात न आल्याबाबत

**(४९) ६९४५४ (३१-०८-२०२३). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर (जि.नांदेड) तालुक्यातील शेवाळा येथे शासनाची 'घरपोच वाळू धोरण' योजनेअंतर्गत २२ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास शासकीय डेपो उभारुन वाळू घाटातून वाळू उत्खन्न करुन शासकीय डेपोमध्ये जमा करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उत्खनन केलेली वाळू दिनांक २२ मे, २०२३ ते आजपर्यंत शासकीय वाळू तहसीलदार देगलूर व ठेकेदार यांच्या संगनमताने नागरिकांसाठी खुली करण्यात आली नसल्याने नागरिकांना चढत्या दराने वाळू खरेदी करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करुन नागरिकांसाठी शासकीय डेपोतून वाळू वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०९-२०२३) :** (१),(२), (३) व (४) मौजे शेवाळा, ता.देगलूर येथील शासकीय डेपो येथे दिनांक २२.०५.२०२३ ते दिनांक ०७.०६.२०२३ या कालावधतील एकुण ६७९० ब्रास वाळू डेपो मध्ये जमा केली आहे. सदर जमा झालेली वाळू नागरीकांना ऑनलाईन खरेदी करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली असता ७२१ नागरिकांनी ६७९० ब्रास रेती महाखनिज प्रणालीद्वारे बुकींग केली आहे आणि वाहतुकीचे दर निश्चित झाल्यानंतर दिनांक १३.०७.२०२३ पासुन वाळू नागरीकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे.

---

**मौजे कामजळगा (ता.मुखेड, जि.नांदेड) येथे के.टी.कंन्सट्रक्शन यांनी गायरान जमीनीतून गौण खनिज उत्खनन केल्याबाबत**

**(५०) ७१०४८ (३१-०८-२०२३). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कामजळगा (ता.मुखेड, जि.नांदेड) येथे के.टी.कंन्स्ट्रक्शन यांनी गायरान जमीनीतून मोठ्या प्रमाणात गौण खनिज उत्खनन करुन शासनाचा करोडो रुपयाचा महसूल बुडविला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गायरान जमीनीवर गौण खनिज उत्खनन करण्याची शासनाची परवानगी नसतानाही उत्खनन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०९-२०२३) :** (१),(२), (३) व (४) मौजे कामजळगा, ता. मुखेड, जि. नांदेड येथील गायरान जमिन गट नं २६ मधुन जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या दिनांक १४.०३.२०११, १८.१२.२०११, २२.०३.२०१२ व ०७.०४.२०१३ च्या आदेशान्वये एकूण ३४९६८ ब्रास दगड या गौण खनिज उत्खननास कत्रांटदार के.टी. कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. इंदोर यांना परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने संबंधित कंपनीने रू.७२,०३,८०८/- एवढ्या स्वामित्वधनाचा भरणा केला आहे. सद्यस्थितीत सदर जागेत/स्थळामध्ये पाणी असल्यामुळे ई.टी.एस मोजणी होऊ शकलेली नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.